१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, गुरुवार २ जुलै, २०२६ • वर्ष-१०४, अंक-११९, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 119 Marathi - Daily - Mumbai, 2 July, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

ठाकरेंच्या अडचणी वाढणार? आणखी एक आमदार शिंदे गटाच्या रडारवर!

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# देहविक्रीला तयार तर गिऱ्हाईक आहेतच

# मोदींचा पत्ता सटकला की सर्व कोसळेल

■ ठाणे



**उबाठाचे खासदार व आमदार फोडण्याच्या राजकारणावर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आज कडव्या भाषेत टीका केली. राज ठाकरे म्हणाले की, प्रश्न विकत घेणाऱ्यांचा नाही तर विकले जाणाऱ्यांचा आहे. आता देह विक्रीला जर समजा हे तयारच असतील तर गिऱ्हाईक आहेतच. हे कुठच्या प्रकारचे राजकारण सुरू आहे? पूर्वी पत्त्याचा बंगला करायचे ना त्या पत्त्याचा हा उलटा बंगला आहे. त्याच्या खालचा जो पत्ता आहे तो नरेंद्र मोदींचा आहे. तो एकदा सटकला की सगळे कोसळणार आहेत. जे काही आज टिकून आहे ते नरेंद्र मोदींवर टिकून आहे. या बाकीच्यांवर नाही. अशा गोष्टींमध्ये तुम्ही ज्या प्रकारचे भयानक राजकारण खेळतात हे त्यांनाही अंगाशी येणार आहे.**

**पुढे** बोलताना राज ठाकरे म्हणाले की, एसआयआरचा सगळ्यात मोठा फटका पश्चिम बंगाल, बिहारला सर्व मतदारसंघात बसला. पश्चिम बंगालमधील जवळपास २७ लाख मते याअंतर्गत काढली गेली. ममता बॅनर्जी सारख्या माजी मुख्यमंत्र्याचाही पराभव होतो ही काही साधी सरळ गोष्ट नाही. देशामध्ये खूप घाणेरडे आणि खूप भयानक राजकारण चालू आहे. याचा फटका भविष्यात भाजपालाही मिळणारच आहे. सत्तेचा अमरपट्टा कोणी घेऊन आलेला नसतो. फक्त प्रश्न असा आहे की आपण करत असलेली कृती हा भविष्यातील पायंडा ठरतो आहे याचे भान राजकीय पक्षांना अथवा नेत्यांना नसेल तर मला पुढच्या पिढ्यांची चिंता जास्त वाटते. राजकारण काय येते जाते. पण शेवटी आपण महाराष्ट्र कुठे नेणार आहोत? देश कुठे नेणार आहोत? महाराष्ट्रात फोडाफोडीचेच सगळे राजकारण सुरू आहे. हे काही उमदे राजकारण नव्हे. चांगले राजकारण नव्हे. उद्या सत्ता गेल्यावर या अशाच प्रकारच्या गोष्टींचा भारतीय जनता पक्षालाही त्रास होईल. त्यावेळेला काय करतील? आपण काय करतोय? कुठपर्यंत जातोय? कुठपर्यंत जायचे? याला काही मर्यादा आहेत की नाही? मी अनेकदा आमच्या लोकांना सांगत आलो आहे की जगात ज्या वेळेला एखाद्या सत्ताधाऱ्याने त्याचे विरोधक संपवलेले आहेत त्या त्या वेळेला त्यांच्यातच विरोधक आणि दुश्मन तयार झालेले आहेत. त्यांनीच त्यांना संपवलेले आहे. ही प्रक्रिया भारतीय जनता पक्षामध्ये सुरू झालेली आहे. त्याच्यामुळे बाहेरचे विरोधी पक्ष तुम्ही संपवणे हे सोडून द्या. आता तुमच्यात जे विरोधक निर्माण झालेले आहेत यातून तुम्हाला जो त्रास होईल तो तुम्ही बघत राहा. हा जगाचा इतिहास आहे. तुम्ही विरोधक संपवलेत की तुमच्यात आतच विरोधक निर्माण होतात.

राज ठाकरे म्हणाले की, सगळे अमित शहांचे राजकारण सुरू आहे. आता शिवसेनेचे सहा खासदार फोडले ते भाजपामध्ये का नाही गेले? तृणमूलचे २२ खासदार फुटले त्यांनी वेगळा गट का केला? उद्या मला दावा सांगायचा असेल पंतप्रधान पदावर तेव्हा मला आतमध्ये विरोध झाला तर मला बाहेरून लोक मतदान करतील किंवा पाठिंबा देतील आणि दुसऱ्यांनी जर समजा कोणी दावा सांगितला तर मी हे जे उभे केलेले आहे यातला कोणी त्यांना पाठिंबा देणार नाहीत. तुम्ही विरोधक संपवता त्यावेळेला दुश्मन तुमच्यातच तयार होतात. तेच चित्र आता तुम्हाला महाराष्ट्रात आणि देशात सर्व ठिकाणी दिसेल. अगदी खालपर्यंत दिसेल. बेधुंद सत्ता ज्यावेळेला येते त्यावेळेला माणसे अशी वागायला लागतात.

## सचिन अहिर बिनविरोध मविआची अखेर माघार

■ मुंबई

**उबाठातून** काल शिंदेसेनेत गेलेले आमदार सचिन अहिर यांची आज महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतिपदावर बिनविरोध निवड झाली. या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून उबाठा गटाचे जगन्नाथ अभ्यंकर रिंगणात होते. मात्र, सभागृहाची परंपरा आणि सर्वानुमते निवड व्हावी, या भूमिकेतून महाविकास आघाडीने ऐनवेळी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने आवाजी मतदानाद्वारे सचिन अहिर यांची एकमताने निवड करण्यात आली.

या निवडणुकीवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यासह महायुती आणि विरोधी पक्षातील सदस्य सभागृहात उपस्थित होते.



विधान परिषदेतील संख्याबळ लक्षात घेता महायुतीचा विजय जवळपास निश्चित मानला जात होता. तरीही संसदीय परंपरा जपण्याच्या उद्देशाने मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विरोधी पक्षाला उमेदवारी पान ७ वर

### बेस्ट कामगार सेनेचा आज मेळावा! नवा अध्यक्ष ठरणार

बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष व उबाठा आमदार सचिन अहिर यांनी साथ सोडल्यानंतर उबाठाकडून डॅमेज कंट्रोलसाठी हालचालींना वेग आला आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी तातडीने बैठक घेत बेस्ट कामगार सेनेच्या वरळीच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. उद्या २ जुलै रोजी बेस्ट कामगार सेनेचा महत्त्वाचा मेळावा होणार आहे. काल मातोश्री निवासस्थानी ही बैठक पार पडली. २०२५ ऑक्टोबरपासून सचिन अहिर हे बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष होते. त्यांच्या नेतृत्वाखाली बेस्टने तीन दिवसांचा यशस्वी संपही केला होता. अहिर यांनी पक्ष सोडल्यानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी पक्षाकडून हालचाली सुरू असून, उद्या २ जुलै रोजी बेस्ट कामगार सेनेचा महत्त्वाचा मेळावा होणार आहे. या मेळाव्यात नव्या अध्यक्षाच्या नावाची घोषणा होण्याची शक्यता असून, आता हे पद कोणाला मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पेट्रोल ५, डिझेल ३ रुपयांनी स्वस्त व्यावसायिक सिलिंडरच्या दरातही घट

■ मुंबई

**आखातातील** युद्ध समाप्तीच्या शक्यतेनंतर देशातील खासगी इंधन विक्रेत्या नायरा एनर्जीने आजपासून पेट्रोलच्या दरात प्रति लिटर ५ रुपये आणि डिझेलच्या दरात ३ रुपयांची कपात जाहीर केली आहे. त्याचबरोबर सरकारने १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमतही १८३.५० रुपयांनी कमी केली आहे. या निर्णयामुळे वाहनधारक आणि व्यावसायिक गॅस वापरणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

रशियाच्या रोसनेफ्टच्या पाठबळावर कार्यरत असलेल्या नायरा एनर्जीने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या



दरात झालेल्या घसरणीचा फायदा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या ब्रेंट क्रूडची किंमत प्रति बॅरल ७१.६० ते ७२.४० डॉलर दरम्यान आली आहे. पश्चिम आशियातील तणाव कमी होणे, अमेरिका-इराण शांतता चर्चेला वेग येऊन होर्मुज सामुद्रधुनीतून तेलपुरवठा सुरळीत झाल्यामुळे कच्च्या तेलाच्या दरात घट झाली आहे. रशियाकडून होणाऱ्या निर्यातीमध्ये पान ७ वर

## चार खून केलेत! पुढचा नंबर तुझा लोकलमध्ये प्रवाशाचा धिंगाणा

■ नवी मुंबई

**पनवेलहून** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) कडे जाणाऱ्या लोकलमध्ये एका प्रवाशाने अचानक धिंगाणा घातला. सहप्रवाशांना शिवीगाळ करत त्याने भीतीचे वातावरण निर्माण केले. 'मी चार खून केले आहेत, पुढचा नंबर तुझा आहे,' अशी धमकीही त्याने प्रवाशांना दिली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होत आहे

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, हा प्रवासी सुरुवातीला मोठमोठ्याने आरडाओरडा करत होता. सहप्रवाशांनी दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने शिवीगाळ आणि धमक्या देणे सुरूच ठेवले. त्याने 'मी चार खून केले आहेत, पुढचा नंबर तुझा,' असे वक्तव्य केल्याने प्रवासी घाबरले. काही प्रवाशांनी धाडस दाखवत त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. या घटनेत कोणालाही दुखापत झाल्याची माहिती नाही. मात्र, काही दिवसांपूर्वी बोरिवली लोकलमध्ये झालेल्या हत्येच्या घटनेनंतर पुन्हा असा प्रकार घडल्याने मुंबई उपनगरीय रेल्वेतील प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## चेंबूरच्या स्कूल बस दुर्घटनेतील एकजण अतिदक्षता विभागात

**दोन गंभीर जखमींवरही उपचार सुरूच**

■ मुंबई

**शाळकरी** विद्यार्थ्यांना घरी घेऊन चाललेल्या एका स्कूल व्हॅनवर झाड कोसळून ११ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना काल दुपारी चेंबूरमध्ये घडली होती. या दुर्घटनेतील तीन गंभीर विद्यार्थ्यांवर सध्या झेन हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असून त्यातील एकाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला अतिदक्षता विभागात दाखल केले आहे.

काल दुपारी चेंबूरमधील 'युनिव्हर्सल हायस्कूल' च्या स्कूल व्हॅनने विद्यार्थी घरी जाण्यासाठी निघाले असताना चेंबूर रोड नंबर ११ येथे या स्कूल व्हॅनवर पिंपळाचे झाड कोसळले. यात विहान श्रीवास्तव (११) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. चार विद्यार्थी गंभीर जखमी झाले होते. त्यातील एकाला काल सायंकाळी उपचार करून डिस्चार्ज देण्यात आला. सध्या तीन पान ७ वर

### त्याला क्रिकेट खेळायला जायचंय बॅट कवटाळून आईचा आक्रोश

विहानच्या निधनानंतरही त्याची आई जुही श्रीवास्तव त्याची क्रिकेटची बॅट हातात घेऊन बसली. त्यांनी त्याला क्रिकेट खेळायला जायचे आहे, असे वारंवार म्हणत आक्रोश करत आहे. आजूबाजूचे लोक तिची समजूत काढण्याचा प्रयत्न करत असले तरी मुलाच्या जाण्याचे दु:ख अजूनही तिला विसरता येत नाही. विहानची शेजारीण राजी मल्होत्रा यांनी सांगितले की, विहान अतिशय हुशार, समजूतदार आणि सुसंस्कृत मुलगा होता. त्याचे व्यावसायिक क्रिकेटपटू बनण्याचे स्वप्न होते.

## राम मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास रुग्णालयात दाखल

■ लखनौ

**श्रीराम** जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना लखनौ येथील मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. यापूर्वीही यावर्षी जानेवारी महिन्यात ८८ वर्षीय महंत नृत्य गोपाल दास यांची प्रकृती बिघडली होती. त्यावेळीही त्यांच्यावर याच रुग्णालयात उपचार करण्यात आले होते आणि उपचारानंतर ते बरे झाले होते.



जानेवारीमध्ये महंत नृत्य गोपाल दास रुग्णालयात दाखल असताना उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी स्वतः रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली होती. तसेच डॉक्टरांकडून त्यांच्या प्रकृतीची माहितीही घेतली होती. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ अयोध्येला भेट देतात तेव्हा ते मणिरामदासजींच्या छावणीत जाऊन महंत नृत्य गोपाल दास यांची भेट घेतात आणि त्यांचे आशीर्वाद घेतात. देश-विदेशात त्यांचे लाखो शिष्य आहेत.

## केतन हत्या प्रकरणात चेतनची लोहगडावर नेऊन दुसऱ्यांदा चौकशी

■ पुणे

**केतन** अग्रवाल हत्या प्रकरणाच्या तपासात पुणे ग्रामीण पोलिसांनी आज सहआरोपी चेतन चौधरीला लोहगड किल्ल्यावर नेऊन हत्येचा प्रसंग पुन्हा एकदा 'साकारला'. यापूर्वी मुख्य आरोपी सिया गोयल व चेतनला सोबत नेऊन असाच हत्येचा प्रसंग साकारला होता. या प्रकरणात सिया गोयल व चेतन चौधरी यांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने दोघांना ३ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

आज पुणे ग्रामीण पोलिसांनी चेतन चौधरीला लोहगड किल्ल्यावर नेऊन संपूर्ण घटनाक्रम पुन्हा साकारला. तपास अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आरोपीकडून कथित गुन्ह्यावेळी



नेमके काय घडले, कोणत्या ठिकाणी हालचाली झाल्या आणि घटनेत त्याची भूमिका काय होती, याची माहिती घेण्यात आली. या प्रक्रियेद्वारे आरोपीच्या जबाबाची घटनास्थळावरील परिस्थितीशी पडताळणी करण्यात आली. दरम्यान, पोलीस तपासात आणखी एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. केतन अग्रवालचा मोबाईल फोन त्याच्या मृत्यूनंतर काही दिवस सिया गोयलच्या ताब्यात होता. त्यानंतर तो कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात आला. या काळात मोबाईलमधील संदेश, कॉल रेकॉर्ड, छायाचित्रे, व्हिडिओ किंवा इतर डिजिटल पुरावे हटवण्यात आले का अथवा त्यात फेरफार करण्यात आला का, याचा तपास फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या मदतीने केला जात आहे.

## बेकायदेशीर आयव्हीएफ केंद्रांवर मकोका! आरोग्यमंत्र्यांची घोषणा

■ मुंबई

**राज्यात** बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या आयव्हीएफ (इन-व्हिट्रो फर्टिलायझेशन) केंद्रांवर, गर्भलिंग निदान करणाऱ्या रॅकेटवर आणि विनापरवाना सोनोग्राफी केंद्रांवर आता 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा' (मकोका) लागू करण्याची तयारी राज्य सरकारने सुरू केली आहे. या संदर्भात आवश्यक कायदेशीर तरतूद पुढील अधिवेशनात करण्यात येईल, अशी घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधानसभेत केली. आमदार अबू आझमी यांनी राज्यातील बेकायदेशीर आयव्हीएफ केंद्रे, विनापरवाना सोनोग्राफी आणि गर्भलिंग निदानाच्या वाढत्या गैरप्रकारांचा मुद्दा उपस्थित करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली.

यावर उत्तर देताना आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले की, गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर आयव्हीएफ केंद्रांच्या माध्यमातून संघटित स्वरूपात सुरू असलेल्या गैरप्रकारांवर प्रभावीपणे अंकुश ठेवण्यासाठी विद्यमान कायदे अधिक कठोर करण्यात येणार आहेत. या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या आरोपींवर 'मकोका' लागू करता यावा, यासाठी पुढील अधिवेशनात कायद्यात आवश्यक दुरुस्ती पान ७ वर

## देशातील २३ राजकीय पक्षांनी सरन्यायाधीशांना पाठवले पत्र

**देशातील २३ राजकीय पक्ष आणि एका अपक्ष खासदाराने भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांना संयुक्त पत्र पाठवून एसआयआर अर्थात विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रिया, निवडणूक आयोगाची भूमिका आणि निवडणुकांशी संबंधित विविध मुद्द्यांबाबत चिंता व्यक्त केली आहे.**



■ नवी दिल्ली

**या पत्रात** निवडणूक आयोगाच्या भूमिकेचाही उल्लेख करण्यात आला असून, एसआयआर प्रक्रियेचा विविध राज्यांतील नागरिकांवर कसा परिणाम झाला, याची उदाहरणेही देण्यात आली आहेत. काँग्रेससह इतर विरोधी पक्षांनी एसआयआर प्रक्रियेबाबत निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या पत्रावर इंडिया आघाडीतील सर्व प्रमुख पक्षांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या आहेत. तसेच, सध्या इंडिया आघाडीपासून काहीसे अंतर राखून असलेल्या आम आदमी पक्ष आणि द्रमुक यांनीही या पत्राला पाठिंबा दिला आहे.काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेशा यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये ही माहिती दिली आहे. रमेश म्हणाले, पान ५ वर

## नोएल टाटा व्होल्टासच्या अध्यक्षपदावरून पायउतार

■ मुंबई

**अवघ्या** आठवडाभरापूर्वी टाटा समूहातील ट्रेन्ट कंपनीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देणारे नोएल टाटा आता व्होल्टास या समूहातील आणखी एका कंपनीच्या अध्यक्षपदावरून पायउतार झाले आहेत. व्होल्टास कंपनीच्या ७२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांनी आपल्या निवृत्तीची घोषणा केली.

ही सभा अध्यक्ष म्हणून माझी शेवटची सभा आहे. कंपनीची भविष्यातील वाटचाल अशाच प्रकारे दमदारपणे सुरू रहावी यासाठी व्यवस्थापनात कंपनीतील अंतर्गत पदोन्नतीच्या माध्यमातून आणि अनुभवी व्यक्तींना संधी देत नवी फळी उभारण्यात आली आहे. हे नवे नेतृत्व कंपनीची घोडदौड

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

अबाधित राखतील, असा माझा विश्वास आहे, असे नोएल टाटा कंपनीच्या भागधारकांना संबोधित करताना म्हणाले.

दरम्यान, टाटा समूहातील होल्डिंग कंपनी पान ७ वर

## गांधी कुटुंबातील मुंबई गटाला 'वाडिलाल' वापरण्याचा अधिकार

**मुंबई हायकोर्टाचा निर्वाळा**

■ मुंबई

**आईस्क्रीम** आणि फळांचे रस या उद्योगातील प्रसिद्ध वाडिलाल ही नाममुद्रा (ट्रेडमार्क) वापरण्याचा अधिकारावरून गांधी कुटुंबातील मुंबई आणि अहमदाबाद अशा दोन गटांत वाद सुरू होता. या वादासंदर्भात निकाल देताना मुंबई उच्च न्यायालयाने गांधी मुंबई गटाला मोठा दिलासा दिला. कुटुंबातील या दोन गटांदरम्यान १९९३ साली उद्योगाच्या विभागणीबद्दल झालेल्या करारानुसार वाडिलाल या नाममुद्रेखाली आईस्क्रीम आणि फळांचे प्रक्रियाकृत रस याचे उत्पादन आणि विक्री करण्याचे अधिकार गांधी मुंबई गटाकडे राहातील, असा स्पष्ट निर्वाळा न्यायालयाने दिला. त्याचबरोबर गांधी मुंबई गटासाठी



निश्चित केलेल्या राज्यांमध्ये वाडिलाल नावाने या पदार्थांची उत्पादन-विक्री करण्यास गांधी अहमदाबाद गटाला मनाई केली.

या संदर्भात शैलेश गांधी, बेला गांधी आणि वाडिलाल डेअरी इंटरनॅशनल लिमिटेड यांनी दाखल केलेल्या याचिकांवर न्या. अमित बोरकर यांच्या न्यायासनासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी लवाद आणि सामोपचार अधिनियम १९९६ च्या कलम ९ अन्वये हा निकाल दिला. ३० मार्च १९९३ रोजी गांधी कुटुंबातील मुंबई आणि अहमदाबाद गटांमध्ये उद्योगाची विभागणी, समभागांचे हस्तांतरण, हक्कांची भौगोलिकदृष्ट्या विभागणी व वाडिलाल नाममुद्रा वापरण्याचा हक्क या चार मुद्द्यांवर आधारित करार झाला आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

### पाहिजेत

मॅरेजब्युरो/ ज्योतिषशास्त्र ऑफिससाठी ठाणे येथे स्टाफ पाहिजेत. **7045943167/ 7045216645** {NC261060}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, पेशंटकेअर, (Male+ Female) पाहिजेत (राहणेखाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828** {NC261061}

लोअरपरेल/ चिंचपोकळी येथे गोडाऊनमध्ये कामासाठी. मुले (पगार १२ ते १४०००) पाहिजेत. संपर्कः **9320064643** किंवा **8080084843** वर Hi पाठवा. {NC261107}

घरकामासाठी (10/12/ 24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC261090}

कुरीअर कंपनीमध्ये पिकअप व डिलीव्हरी साठी त्वरीत मुले पाहिजेत. ठिकाण- फोर्ट, दादर, लोअरपरेल, वडाळा, नवी मुंबई. दररोज रोख ८००/- + प्रवास खर्च. SPEEDMAN EXPRESS 191-B, 9th Cavel Cross lane, 1st floor, Dr. viegas street, Near Barretto high School, Chirabazar, Mumbai- 400002. Note- फोन न करता ऑफीसमध्ये येणे. {NC261127}

### पाहिजेत

कंपनीमध्ये भरती टिशू पेपर पॅकिंगसाठी स्टाफ पाहिजे १९,५२०/- - २४,८३०/-: **7738115646** {NC261128}

### Situation Vacant

House maid 24 hours salary, Stay, Food, Cloths provided. **9833286296** {NC261090}

### व्यवसायविषयक

महिला/ मुलींना फक्त ६ महिन्यात 10,00,000/- कमवून देणारे जीवन विमा मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC261097}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# स्टँड अप कॉमेडीला आवर घाला! सुप्रीम कोर्टात जनहित याचिका

■ नवी दिल्ली

**काही** दिवसांपूर्वी सोशल मीडियावर वादग्रस्त ठरलेल्या '३७० रुपयांची बिरयानी' प्रकरणाच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल झाली आहे. सोशल मीडियावर सध्या आक्षेपार्ह विधाने करून प्रसिद्धी मिळवणाऱ्या आणि वाद निर्माण करणाऱ्या स्टँड अप कॉमेडियनवर आवर घालण्यासाठी ठोस अशी कायदेशीर चौकट तयार करण्याची विनंती याचिकाकर्त्याने न्यायालयाला केली आहे.

अॅड. विशाल तिवारी यांनी घटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये ही जनहित याचिका दाखल केली आहे. त्यामध्ये मुख्य भर स्टँड अप कॉमेडियन्सवर असला तरी या घटनेतून बोध घेत सर्व प्रकारच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना समाजभान आणि नैतिकतेच्या चौकटीत बसवणे ही काळाची गरज आहे, असे अॅड. तिवारी यांनी याचिकेत म्हटले आहे.

स्टँड अप कॉमेडियन प्रणित मोरे याच्या एका लाईव्ह शोमध्ये प्रेक्षकांमधील एका इसमाने आपण आपल्या मैत्रिणीला ३७० रुपयांची बिरयानी खाऊ घातली. ते ३७० रुपये तिच्याकडून वसूल करेन, अशा आशयाचे वक्तव्य केले होते. त्यानंतर या लाईव्ह शोचा व्हिडिओ व्हायरल झाला आणि नव्या वादाला तोंड फुटले. याचा संदर्भ देत अॅड. तिवारी यांनी सोशल मीडियावर वाट्टेल त्या गोष्टी काही क्षणांत कशा लाखो लोकांपर्यंत पोहोचवल्या जात आहेत, याचे गांभीर्य न्यायालयाच्या निदर्शनास आणून देत सोशल मीडियाच्या स्वातंत्र्यावर कायदेशीर चौकटीने आवर घालण्याची विनंती न्यायालयाला केली.

# भाजपाच्या गुंडांनी अंडी फेकली खा. महुआ मोइत्रा यांचा आरोप

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमधील तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि खासदार महुआ मोइत्रा यांच्यावर आज अज्ञात आंदोलकांनी अंडी फेकली. एका हॉटेलमध्ये महुआ मोइत्रा या पक्षाच्या कार्यकर्त्यांसोबत बैठक घेत असताना हा प्रकार घडला. या हल्ल्यामागे भाजपाच्या गुंड कार्यकर्त्यांचा हात असल्याचा थेट आरोप मोइत्रा यांनी केला आहे.



कृष्णनगर मतदारसंघाच्या खासदार महुआ मोइत्रा आज कार्यकर्त्यांसह एका हॉटेलमध्ये चर्चा करत होत्या. त्याच वेळी हॉटेलबाहेर जमलेल्या एका जमावाने जोरदार घोषणाबाजी करत हॉटेलच्या दिशेने अंडी फेकण्यास सुरुवात केली. या संपूर्ण घटनेचे दोन व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. पहिल्यात व्हिडिओत काही महिला आणि पुरुष हॉटेलच्या दिशेने अंडी फेकत घोषणाबाजी करताना दिसत आहेत. दुसरा व्हिडिओ स्वतः महुआ मोइत्रा यांनी हॉटेलच्या आतून शूट केला आहे. यामध्ये त्या कार्यकर्त्यांसोबत बसलेल्या असताना हॉटेलच्या काचेच्या खिडक्यांवर अंडी आदळत आहेत. महुआ मोइत्रा यांनी आणखी एक व्हिडिओ जारी करत स्थानिक पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. हॉटेलबाहेर गर्दी जमल्याची माहिती आधीच देऊनही पोलिसांनी कोणतीही सुरक्षा दिली नाही किंवा कारवाई केली नाही, असा दावा त्यांनी केला.

# नेस्को ड्रग प्रकरणात १३ वा आरोपी अटकेत

■ मुंबई

**गोरेगाव** (पूर्व) येथील नेस्को प्रदर्शन केंद्रात एप्रिल महिन्यात आयोजित म्युझिक कॉन्सर्टदरम्यान अंमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे दोन तरुणांचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणात पोलिसांनी आणखी एक मोठी कारवाई करत १३ व्या आरोपीला अटक केली आहे.

११ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या या कॉन्सर्टमध्ये २४ वर्षीय तरुणी आणि २८ वर्षीय तरुणाचा ड्रग ओव्हरडोसमुळे मृत्यू झाला होता. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू करत आतापर्यंत १२ आरोपींना अटक केली होती. तपासादरम्यान पोलिसांनी ड्रग पुरवठा साखळी उघड करत आता १३ व्या आरोपीला ताब्यात घेतले आहे. या आरोपीचा ड्रग पुरवठा आणि वितरणाशी संबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणात आणखी काही संशयितांचा शोध सुरू असल्याचेही पोलिसांनी सांगितले.

# शक्तीपीठ रद्द करण्यासाठी ७ जुलैला मुंबईत धरणे आंदोलन

■ सांगली

**हजारो** एकर सकस शेती नष्ट करणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा या मागणीसाठी ७ जुलै रोजी मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीने आज सांगलीत झालेल्या बैठकीत घेतला.

या बैठकीला कामेरीचे सरपंच रणजित पाटील, कॉ. धनाजी गुरव, बी. जी. काका पाटील, शहाजी पाटील, गुंडा पवार, अॅड. विजय पाटील, कॉ. उमेश देशमुख, अॅड. दीपक लाड, इंद्रजीत पाटील आदी उपस्थित होते. रणजित पाटील यांनी सांगितले की, शक्तीपीठ महामार्ग सांगली जिल्ह्यातील पलूस, कडेगाव, विटा आणि वाळवा या चार तालुक्यांतील २६ गावातून प्रस्तावित असून यामध्ये चार तालुक्यातील १५०० ते २१०० एकर जमीन जाणार आहे. याशिवाय ३० फुटांचा बांध तयार झाल्याने गावातील महामार्गालगतची शेतीही बाधित होणार आहे. वाळवा तालुक्यातील जमीन पाणथळ असून ती गेल्याने याचा परिणाम स्थानिक रोजगार, साखर कारखाने यांच्यावर होणार आहे. कॉ. गुरव म्हणाले की, या महामार्गाच्या भूसंपादनासाठी २०१४ चा अद्ययावत कायदा असतानाही १९५५ च्या कायद्यानुसार भूसंपादन करण्याचा निर्णय घेण्यामागे काय हेतू आहे, हे समजले पाहिजे.

एकरी १५० टन उस उत्पादन करणारी शेती सुपीक घेऊन शेतकरी भूमीहिन करण्याचा डाव यामागे आहे. या महामार्गाबाबत विधिमंडळात चर्चा व्हायला हवी, अशी आमची भूमिका असून हा महामार्ग रद्द करण्यात यावा या मागणीसाठी मुंबईत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

# दिल्लीला सहा पदरी बोगदा तर उत्तर प्रदेशात चार पदरी महामार्ग

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** मंत्रिमंडळाने दिल्लीतील सहा पदरी द्वारका बोगदा आणि उत्तर प्रदेशातील कानपूर ते कबरई दरम्यानच्या चार पदरी महामार्ग प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या दोन्ही पायाभूत सुविधा प्रकल्पांची एकूण किंमत १४,११५ कोटी रुपये आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज या महत्त्वाच्या निर्णयांची घोषणा केली. दिल्ली आणि उत्तर प्रदेशातील वाहतूक व्यवस्था अधिक आधुनिक आणि सक्षम करण्यासाठी हे दोन मोठे रस्ते प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, तसेच देशाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक होणार आहे.

# चाकूरमध्ये ५० वर्षांचे चिंचेचे झाड बुलडोझरखाली जमीनदोस्त

■ लातूर

**चाकूर** शहराच्या जुन्या बसस्थानक परिसरात गेली तब्बल पाच दशके उभे असलेले, हजारो प्रवाशांना सावली देणारे आणि अनेक पिढ्यांच्या आठवणी जपणारे ऐतिहासिक चिंचेचे झाड विकासाच्या बुलडोझरखाली कायमचे कोसळले. लातूर-नांदेड राष्ट्रीय महामार्गाच्या दुपदरीकरणाच्या कामात हे झाड अडथळा ठरत असल्याने ते तोडण्यात आले. मात्र या निर्णयामुळे नागरिकांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

# नांदेडमध्ये श्रीकांत शिंदेंच्या ताफ्याला उबाठाचे काळे झेंडे

■ नांदेड

**राज्यातील** राजकीय घडामोडींना वेग आला असतानाच खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नांदेड दौऱ्यादरम्यान त्यांच्या ताफ्याला उबाठाच्या कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवत जोरदार घोषणाबाजी केली. हिंगोली लोकसभा मतदारसंघातील सारखनी गावाजवळ घडलेल्या या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत आंदोलकांना ताब्यात घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

खा. श्रीकांत शिंदे हे हिंगोली लोकसभा मतदारसंघातील सारखनी गावाकडे संवाद मेळाव्यासाठी जात असताना त्यांच्या ताफ्यात खासदार नागेश पाटील आष्टीकर हेही उपस्थित होते. आष्टीकर यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर त्यांच्या मतदारसंघात विरोधाचे वातावरण निर्माण झाले आहे. सारखनी गावातून ताफा जात असताना उबाठाच्या शिवसैनिकांनी काळे झेंडे दाखवत घोषणाबाजी केली. आंदोलकांच्या हातात काळे झेंडे, भगवे झेंडे आणि निषेधाचे फलक होते. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून आंदोलकांना ताब्यात घेतले आणि ताफा पुढे रवाना केला.

# पुण्यात वाहतूक पोलिसाच्या अंगावर टेम्पो घालण्याचा प्रयत्न

■ पुणे

**पुण्यात** वाहतूक पोलिसाच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

वानवडी परिसरात वाहतूक पोलिसांकडून फॅन्सी नंबर प्लेट आणि काळ्या काचांवर कारवाई सुरू होती. त्यावेळी सोलापूरकडे निघालेल्या टेम्पो चालकाला पोलिसांनी अडवण्याचा प्रयत्न केला. मात्र, कारवाईच्या भीतीने चालकाने टेम्पो सुसाट पळविला आणि पोलिसाच्या अंगावर गाडी घालण्याचाही प्रयत्न केला. यानंतर टेम्पो चालकाने पळ काढताना मार्गातील सुमारे २० ते २५ वाहनांना धडक दिली. या अपघातात अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले असून काही प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकारामुळे पुणे-सोलापूर महामार्गावर वानवडी

**२५ वाहनांना धडक**

ते रवी दर्शन चौकादरम्यान मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

दरम्यान, नागरिक आणि पोलिसांनी पंधरा नंबर परिसरात टेम्पो अडवला. संतप्त नागरिकांनी टेम्पोवर चढून चालकाला चोप दिला आणि त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. या प्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

# मानधनवाढीसाठी मुंबईत आदिवासी महिलांचे आंदोलन

■ मुंबई

**आझाद** मैदान येथे पेसा मोबिलायझर संघर्ष समितीच्या वतीने हजारो आदिवासी महिलांनी आंदोलन सुरू केले. ग्रामसभा मोबिलायझर्सची मंजूर पदे कमी करण्याचा निर्णय रद्द करावा, तसेच मानधन वाढवून पदे कायम ठेवावीत, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने आदिवासी महिला या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. सरकारने घेतलेल्या निर्णयाविरोधात त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सध्या मिळणारे मानधन अत्यल्प असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपातळीवर मोठ्या प्रमाणात कामाचा भार असून एका व्यक्तीवर अनेक गावांची जबाबदारी येत आहे. अशा परिस्थितीत पदे कमी करणे अन्यायकारक आहे. सरकारने आदिवासी महिलांना सन्मान द्यावा आणि घेतलेला निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली आहे.

# खेळताना गळफास लागून सातवीच्या विद्यार्थिनीचा मृत्यू

कोल्हापूर - घरात झोका बांधून खेळत असताना ओढणीचा फास गळ्यात अडकल्याने सातवीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा गळफास लागून मृत्यू झाला. आफिया जाबीर शेख (१३) असे या मृत मुलीचे नाव आहे. जिल्ह्यातील आजरा शहरात सोमवारी रात्री ही दुर्दैवी घटना घडली. आफिया ही आपल्या कुटुंबासह नाईक गल्लीत भाड्याच्या खोलीत राहत होती. सोमवारी रात्री आफिया घरातच खेळत होती. घरातील लाकडी तुळईच्या हुकाला ओढणी बांधून ती झोका घेत होती.




# आजचे राशी भविष्य

गुरुवार ता. २ जुलै २०२६
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| | |
|---|---|
| मेष | वास्तुसंबंधित कामे मार्गी लागतील. वडिलोपार्जित व्यवसायात यश मिळेल. विवाहोत्सुक मंडळींना अनुकूल काळ. |
| वृषभ | आनंदी दिवस आहे. छोट्या सहलीचा आनंद लुटाल. नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. |
| मिथुन | मनात सकारात्मक विचार ठेवा. एखाद्याबद्दल अढी वाढवू नका. नोकरीत जबाबदाऱ्या वाढू शकतात. अचानक धनलाभाचे योग. |
| कर्क | जोडीदाराच्या मर्जीनुसार वागावे लागेल. मित्रमंडळींच्या भेटीने आनंद होईल. छोटी सहल आयोजित कराल. |
| सिंह | नोकरीमध्ये जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. कामाचा ताण जाणवेल. संततीस उच्च शिक्षणाच्या संधी लाभतील. |
| कन्या | विविध प्रकारच्या माध्यमातून आर्थिक लाभ होतील. मन प्रसन्न राहील. प्रिय व्यक्तींच्या गाठीभेटी यशस्वी होतील. |
| तूळ | वास्तुसंबंधित कामांना गती येईल. गृहउद्योगातून आर्थिक लाभ चांगले होतील. वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक. |
| वृश्चिक | कुटुंबियांसमवेत दूरच्या प्रवासाच्या योजना आखाल. नवीन करारमदार होण्याची शक्यता. जोडीदाराशी पटवून घ्यावे लागेल. |
| धनु | आर्थिक व्यवहार लांबणीवर पडण्याची शक्यता राहील. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याची तक्रार उद्भवू शकते. नोकरीत कामाचा ताण जाणवेल. |
| मकर | सकारात्मक विचार राहतील. मुलांबाबत सुवार्ता समजतील. उच्च शिक्षण घेऊ पाहणाऱ्यांना नवीन संधी मिळतील. |
| कुंभ | एखादी चिंता निर्माण होऊ शकते. संयमाने राहावे लागेल. घरातील वातावरण कलुषित होऊ देऊ नका. नोकरीत यश मिळेल. |
| मीन | कामानिमित्त प्रवास घडू शकतो. वडिलोपार्जित कामे मार्गी लागतील. संततीच्या चिंता दूर होतील. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. |

# लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 26 • सोडत दिनांक 01/07/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | AK-08 : 6912 | |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | 6912 | महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर; श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई; श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (2 बक्षिसे) |
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 7942 | अंबिका एजन्सी - दादर, मुंबई; रॉयल एजन्सी - आंकली; प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 6388 | हरी श्री लॉटरी सेंटर - नालासोपारा; किशोर लॉटरी सेंटर, सांगली |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 1012 | 1803 | 1870 | 2790 | 3519 | 3740 | 4233 | 4467 | 5671 | 6952 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1577 | 1665 | 2040 | 2730 | 3159 | 4317 | 4694 | 5571 | 7730 | 7961 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1572 | 3922 | 5865 | 5941 | 5947 | 6405 | 6837 | 7212 | 7275 | 7552 |

सातवे बक्षीस रु. 110/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1010 | 1412 | 2029 | 2529 | 3042 | 3471 | 3993 | 4445 | 4796 | 5249 | 5951 | 6543 | 7007 | 7576 |
| 1012 | 1494 | 2035 | 2537 | 3043 | 3509 | 3999 | 4447 | 4801 | 5258 | 5959 | 6556 | 7010 | 7580 |
| 1013 | 1561 | 2043 | 2542 | 3058 | 3523 | 4000 | 4457 | 4848 | 5303 | 5973 | 6562 | 7019 | 7582 |
| 1041 | 1579 | 2059 | 2545 | 3083 | 3526 | 4041 | 4459 | 4869 | 5354 | 5987 | 6563 | 7029 | 7587 |
| 1069 | 1614 | 2078 | 2548 | 3088 | 3535 | 4069 | 4464 | 4894 | 5373 | 6006 | 6566 | 7072 | 7617 |
| 1091 | 1651 | 2094 | 2602 | 3100 | 3543 | 4090 | 4466 | 4908 | 5375 | 6011 | 6580 | 7080 | 7633 |
| 1099 | 1662 | 2099 | 2625 | 3111 | 3581 | 4113 | 4479 | 4935 | 5384 | 6016 | 6602 | 7098 | 7644 |
| 1107 | 1699 | 2113 | 2677 | 3147 | 3600 | 4124 | 4484 | 4941 | 5454 | 6039 | 6608 | 7130 | 7680 |
| 1112 | 1701 | 2122 | 2700 | 3178 | 3630 | 4143 | 4498 | 4945 | 5469 | 6074 | 6618 | 7153 | 7714 |
| 1116 | 1711 | 2199 | 2703 | 3186 | 3632 | 4146 | 4517 | 4946 | 5470 | 6086 | 6631 | 7161 | 7722 |
| 1122 | 1715 | 2255 | 2738 | 3191 | 3641 | 4156 | 4521 | 4948 | 5486 | 6106 | 6646 | 7176 | 7734 |
| 1131 | 1770 | 2262 | 2741 | 3243 | 3679 | 4186 | 4534 | 4956 | 5512 | 6123 | 6666 | 7227 | 7738 |
| 1173 | 1808 | 2263 | 2806 | 3302 | 3692 | 4194 | 4617 | 4983 | 5518 | 6130 | 6670 | 7229 | 7744 |
| 1190 | 1814 | 2278 | 2817 | 3303 | 3696 | 4207 | 4627 | 4994 | 5558 | 6162 | 6687 | 7230 | 7760 |
| 1221 | 1821 | 2307 | 2828 | 3305 | 3721 | 4248 | 4640 | 5005 | 5692 | 6163 | 6688 | 7242 | 7765 |
| 1236 | 1850 | 2309 | 2838 | 3313 | 3734 | 4335 | 4641 | 5051 | 5705 | 6165 | 6696 | 7247 | 7768 |
| 1267 | 1859 | 2331 | 2848 | 3333 | 3736 | 4336 | 4645 | 5089 | 5735 | 6246 | 6709 | 7305 | 7773 |
| 1315 | 1907 | 2353 | 2864 | 3335 | 3831 | 4366 | 4670 | 5092 | 5761 | 6249 | 6725 | 7311 | 7779 |
| 1333 | 1910 | 2360 | 2928 | 3352 | 3833 | 4371 | 4696 | 5105 | 5762 | 6260 | 6757 | 7317 | 7784 |
| 1350 | 1911 | 2368 | 2938 | 3356 | 3834 | 4373 | 4714 | 5123 | 5815 | 6287 | 6758 | 7421 | 7793 |
| 1354 | 1944 | 2379 | 2949 | 3395 | 3853 | 4401 | 4722 | 5137 | 5851 | 6365 | 6761 | 7455 | 7872 |
| 1374 | 1951 | 2418 | 2952 | 3418 | 3895 | 4407 | 4725 | 5153 | 5853 | 6393 | 6848 | 7465 | 7878 |
| 1386 | 1962 | 2494 | 2982 | 3420 | 3938 | 4418 | 4742 | 5155 | 5858 | 6418 | 6849 | 7470 | 7900 |
| 1387 | 1980 | 2499 | 3003 | 3422 | 3939 | 4421 | 4788 | 5163 | 5866 | 6526 | 6863 | 7517 | 7935 |
| 1391 | 2002 | 2525 | 3034 | 3447 | 3954 | 4441 | 4794 | 5222 | 5870 | 6536 | 6980 | 7544 | 7972 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

निकाल • महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 26 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 01/07/2026

| | |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-01 : 5708 |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 4471 |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 5416 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 3523 | 3821 | 3935 | 4038 | 4365 | 4399 | 5191 | 5230 | 5331 | 5815 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1172 | 1470 | 1492 | 3152 | 3212 | 4743 | 4773 | 4817 | 5271 | 5612 |

सहावे बक्षीस रु. 250/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1010 | 1516 | 1858 | 2486 | 2746 | 3338 | 3779 | 4406 | 4841 | 5416 |
| 1019 | 1619 | 1871 | 2494 | 2829 | 3342 | 3797 | 4420 | 4852 | 5482 |
| 1071 | 1661 | 1914 | 2507 | 2928 | 3389 | 3803 | 4452 | 4983 | 5501 |
| 1089 | 1696 | 1989 | 2522 | 2942 | 3405 | 3835 | 4485 | 4990 | 5524 |
| 1121 | 1711 | 2099 | 2550 | 2943 | 3436 | 3867 | 4554 | 5106 | 5546 |
| 1166 | 1712 | 2113 | 2562 | 2972 | 3489 | 3871 | 4618 | 5115 | 5600 |
| 1210 | 1726 | 2192 | 2623 | 2992 | 3732 | 3903 | 4687 | 5126 | 5671 |
| 1266 | 1810 | 2272 | 2627 | 3077 | 3733 | 4074 | 4724 | 5131 | 5729 |
| 1290 | 1815 | 2276 | 2634 | 3093 | 3753 | 4086 | 4779 | 5197 | 5758 |
| 1340 | 1824 | 2444 | 2672 | 3237 | 3776 | 4367 | 4828 | 5277 | 5996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

निकाल • महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 26 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 01/07/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-05 : 3737 | श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई |
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 4299 | किशोर लॉटरी सेंटर, सांगली |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 8317 | |
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 2824 | विशेष डिस्ट्रिब्युटर, गोरेगाव |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1182 | 1764 | 2263 | 3341 | 5925 | 7131 | 7748 | 8357 | 8776 | 8926 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0410 | 0432 | 0741 | 1236 | 2887 | 5712 | 6543 | 8419 | 8724 | 9042 |

सातवे बक्षीस रु. 150/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु. 150/- (सर्व मालिकांसाठी) | 1121 | 2200 | 3232 | 4144 | 5055 | 5954 | 6914 | 8008 | 9041 |
| | 1185 | 2227 | 3235 | 4254 | 5115 | 6019 | 6976 | 8155 | 9042 |
| | 1211 | 2229 | 3236 | 4290 | 5236 | 6031 | 7049 | 8208 | 9159 |
| 0002 0390 | 1223 | 2239 | 3324 | 4304 | 5255 | 6067 | 7073 | 8275 | 9295 |
| 0008 0403 | 1410 | 2298 | 3329 | 4342 | 5308 | 6090 | 7099 | 8448 | 9321 |
| 0055 0527 | 1528 | 2481 | 3345 | 4351 | 5353 | 6362 | 7184 | 8479 | 9369 |
| 0070 0573 | 1549 | 2482 | 3349 | 4405 | 5360 | 6455 | 7201 | 8535 | 9389 |
| 0100 0590 | 1583 | 2578 | 3409 | 4435 | 5446 | 6514 | 7368 | 8546 | 9393 |
| 0124 0675 | 1641 | 2639 | 3410 | 4437 | 5492 | 6517 | 7537 | 8587 | 9399 |
| 0140 0705 | 1718 | 2708 | 3537 | 4474 | 5496 | 6541 | 7557 | 8607 | 9429 |
| 0161 0746 | 1738 | 2721 | 3583 | 4521 | 5558 | 6603 | 7623 | 8748 | 9646 |
| 0170 0781 | 1766 | 2745 | 3653 | 4624 | 5572 | 6605 | 7656 | 8773 | 9653 |
| 0179 0899 | 1797 | 2826 | 3940 | 4645 | 5636 | 6661 | 7657 | 8821 | 9774 |
| 0219 0925 | 1855 | 2996 | 4040 | 4700 | 5766 | 6667 | 7693 | 8889 | 9829 |
| 0225 0967 | 2005 | 3034 | 4099 | 4964 | 5805 | 6707 | 7743 | 9024 | 9948 |
| 0240 1115 | 2165 | 3199 | 4139 | 5023 | 5901 | 6755 | 7773 | 9039 | 9961 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री

निकाल • महाराष्ट्र राज्य लॉटरी • विजयालक्ष्मी विकली लॉटरी • सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 26 • तिकीट किं. रु. 30/- • सोडत दिनांक 01/07/2026

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SV-01 : 1908 |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3987 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2458 | 2493 | 3396 | 3481 | 3489 | 3633 | 4314 | 4470 | 4951 | 5552 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1505 | 2149 | 2470 | 2535 | 2643 | 3361 | 3903 | 3904 | 4407 | 5686 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1734 | 1893 | 2582 | 2879 | 3131 | 4520 | 4996 | 5048 | 5239 | 5798 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. 300/- | | 2026 | 2439 | 3371 | 4288 | 4845 | 5638 |
| | | 2121 | 2465 | 3381 | 4345 | 4848 | 5652 |
| 1013 | 1277 | 2200 | 2837 | 3431 | 4354 | 4943 | 5654 |
| 1107 | 1340 | 2210 | 3002 | 3436 | 4412 | 5065 | 5656 |
| 1119 | 1396 | 2211 | 3031 | 3698 | 4479 | 5072 | 5698 |
| 1142 | 1599 | 2215 | 3038 | 3753 | 4584 | 5087 | 5753 |
| 1164 | 1680 | 2224 | 3089 | 3866 | 4657 | 5100 | 5756 |
| 1171 | 1690 | 2250 | 3225 | 3933 | 4684 | 5192 | 5865 |
| 1175 | 1715 | 2251 | 3302 | 3998 | 4690 | 5251 | 5870 |
| 1187 | 1816 | 2256 | 3309 | 4031 | 4730 | 5354 | 5957 |
| 1213 | 1827 | 2258 | 3322 | 4040 | 4794 | 5435 | 5975 |
| 1217 | 1863 | 2271 | 3347 | 4047 | 4801 | 5529 | 5981 |
| 1261 | 1941 | 2382 | 3349 | 4143 | 4842 | 5587 | 5998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. २/७/२०२६

| | | |
|---|---|---|
| ९ | ० | ५ |
| १० | ०४ | ५४ |
| ८५ | ०९ | ५९ |
| १२६ | १३६ | १४० |
| २७० | २८० | ३५७ |

# नसरापूरप्रमाणे जळगाव बलात्कार प्रकरण फास्ट ट्रॅकवर चालवा

## नाना पटोलेंची मागणी

■ मुंबई



**काँग्रेसचे** आमदार नाना पटोले यांनी जळगाव सामूहिक बलात्कार प्रकरणाचा मुद्दा आज विधानसभेत उपस्थित केला. नसरापूरप्रमाणे जळगाव सामूहिक बलात्कार प्रकरणही चालवून फास्ट ट्रॅक न्यायालयात त्वरीत निकाल लावावा, अशी मागणी त्यांनी केली.

नाना पटोले म्हणाले की, नसरापूर येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात ज्या वेगाने खटला चालवून आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. त्याचप्रमाणे जळगाव सामूहिक बलात्कार प्रकरण व राज्यातील महिलांवरील इतर गंभीर अत्याचार प्रकरणांचाही फास्ट ट्रॅक न्यायालयात त्वरीत निकाल लावावा. तसेच महिलांच्या सुरक्षेच्या मुद्यावर सरकार गंभीर नसून हे सरकार उदासीन आहे. याबाबत सरकारला तंबी देण्यात यावी.

# ग्रामीण आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी रिक्त पदे भरा



## वडेट्टीवार यांची मागणी

■ मुंबई

**विधानसभेतील** प्रश्नोत्तर काळात काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटींवर सरकारचे लक्ष वेधले. रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करूनही डॉक्टर व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याने नागरिकांना अपेक्षित आरोग्यसेवा मिळत नसल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली.

वडेट्टीवार म्हणाले की, ब्रह्मपुरी येथील रुग्णालयाचे १०० खाटांच्या रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यात आले असले तरी ८३ पदांच्या मंजुरीचा प्रस्ताव गेली दोन वर्षे मंत्रालयात प्रलंबित आहे. इमारत आणि सुविधा उपलब्ध असूनही कर्मचारी नसल्यामुळे रुग्णसेवा प्रभावित होत आहे. राज्यातील अनेक रुग्णालयांची ५० ते ७० टक्के कामे पूर्ण झाली असून केवळ निधीअभावी ती रखडली आहेत. अशा प्रकल्पांचा तातडीने आढावा घेऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. ग्रामीण रुग्णालयांना आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्राधान्याने निधी द्यावा. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी सध्या दिला जाणारा १ कोटी ६० लाख रुपयांचा निधी अपुरा असून तो किमान ५ कोटी रुपये करावा. अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांवर ४० ते ५० गावांचा आरोग्यभार असल्याने सध्याचा निधी अपुरा पडत आहे. तसेच कोरोना काळात जीव धोक्यात घालून सेवा देणाऱ्या अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, शिपाई तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित भत्ते आणि देयके अद्याप मिळालेली नाहीत.

# म्यानमारमध्ये अडकलेल्या तरुणांच्या सुटकेसाठी सरकारने हालचाल करावी

■ मुंबई

**म्यानमारमध्ये** नोकरीच्या आमिषाने अडकलेल्या महाराष्ट्रातील तरुणांची सुरक्षित सुटका करण्यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारशी समन्वय साधून तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत औचित्याच्या मुद्याद्वारे केली. तसेच समृद्धी महामार्गावरील वाढत्या अपघातांवर प्रभावी उपाययोजना करून नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी, असेही त्यांनी नमूद केले. वडेट्टीवार म्हणाले की, बीड, नाशिक, धाराशिव, चाळीसगाव, ठाणे आदी भागांतील अनेक तरुणांना नोकरीच्या आमिषाने थायलंडमार्गे म्यानमारमध्ये नेऊन सायबर फसवणुकीचे काम करण्यास भाग पाडले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हा आंतरराष्ट्रीय मानवी तस्करीचा गंभीर प्रकार असून राज्य सरकारने केंद्र सरकारच्या मदतीने या तरुणांची तातडीने आणि सुरक्षित सुटका करावी.

# चंदगडच्या इनाम जमिनींचा प्रश्न मार्गी १२ हजार शेतकरी कुटुंबांना दिलासा

■ कोल्हापूर

**चंदगड** तालुक्यातील ४७ गावांतील सुमारे १२ हजार शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा देत 'हेरे सरंजाम' इनाम जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. विशेष बाब म्हणून नजराणा रक्कम सरसकट माफ करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय महसूल व वन विभागाने जारी केला असून, तब्बल ५५ वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागला आहे. याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत माहिती दिली.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, चंदगड तालुक्यातील १२ हजार कुटुंबांच्या जवळपास ११ हजार ३९४ हेक्टर क्षेत्रावरील जमिनी 'हेरे सरंजाम' म्हणून नोंद आहेत. या जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. हा प्रस्ताव आल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांकडे हेरे सरंजाम इनाम जमिनी वाटपाबाबत मूळ फेरफार, इतर अनुषंगिक फेरफार, तसेच १९५१ पासूनचे गाव नमुने आणि सातबारा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. यामुळे अभिलेख कक्षामध्येही आवश्यक कागदपत्रे न सापडल्याने शर्तभंग तसेच धारणाधिकार वर्ग-१ करण्याच्या प्रकरणांना मंजुरी देण्यात अडचणी निर्माण झाल्या. हा सुमारे १२ हजार कुटुंबांचा प्रश्न होता.




# सर्पदंश उपचारांसाठी सर्पविष बँक स्थापना करा! आ. पाचपुतेंची मागणी

■ मुंबई

**राज्यातील** सर्पदंशाच्या घटनांवर प्रभावी उपचार उपलब्ध व्हावेत, यासाठी महाराष्ट्रात प्रादेशिक सर्पविष संकलन बँक स्थापन करण्याची मागणी भाजपा आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत केली. या प्रस्तावावर सकारात्मक विचार करण्यात येईल, अशी ग्वाही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सभागृहात दिली.

आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत सांगितले की, महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये सापांच्या विषाची रचना बदलत असल्याने स्थानिक सर्पविषावर आधारित प्रतिविष तयार करण्यासाठी प्रादेशिक सर्पविष संकलन बँक उभारणे आवश्यक आहे. तसेच मोनोव्हॅलंट अँटी-व्हेनम विकसित करणे, प्रशिक्षित सर्पमित्रांना वैज्ञानिक संशोधनासाठी सर्पविष संकलनाची परवानगी देणे, सर्पदंशग्रस्तांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांतील डॉक्टरांना विशेष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.



यावर उत्तर देताना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, प्रादेशिक सर्पविष बँकेच्या प्रस्तावाचा आरोग्य, वैद्यकीय शिक्षण आणि वन विभागाच्या संयुक्त बैठकीत विचार केला जाईल. तसेच सर्पदंशावरील तातडीच्या उपचारांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये अँटी-स्नेक व्हेनम डायग्नोस्टिक किट उपलब्ध करून देण्यात येणार असून, जनजागृती वाढविण्यावरही सरकार भर देणार आहे.

# पीक विमा प्रश्नावर विरोधकांचे विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन

■ मुंबई




**यवतमाळचे** काँग्रेस आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी पीकविमा प्रश्नावर विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन करत शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. या आंदोलनात आमदार विजय वडेट्टीवार आणि आमदार अमित झनकही सहभागी झाले. यावेळी मांगुळकर यांनी 'शेतकऱ्यांना न्याय द्या, पीकविमा तत्काळ द्या' अशा मागणीचा फलक हातात घेतला होता.

या आंदोलनाची दखल घेत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून संवाद साधला व चर्चा केली. रखडलेल्या पिकविम्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन कार्यवाही केली जाईल असे त्यांनी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र, दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी वेळेत झाली नाही, तर शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आमदारांनी दिला.

# धारावी कोळीवाडा सीमांकन दुरुस्तीची काँग्रेसची मागणी

■ मुंबई

**विधानसभेत** औचित्याचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेस आमदार ज्योती गायकवाड यांनी धारावी कोळीवाड्याच्या सीमांकन आणि पुनर्विकास प्रक्रियेवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. कोळी बांधव हे मुंबईचे आद्य नागरिक आणि भूमिपुत्र असल्याचे सांगत त्यांनी त्यांच्या ऐतिहासिक ओळखीवर व पारंपरिक हक्कांवर गदा आणली जात असल्याचा आरोप केला.

आमदार गायकवाड यांनी म्हटले की, कोळी बांधव हे मुंबईचे आद्य नागरिक आणि या शहराचे भूमिपुत्र आहेत. धारावी कोळीवाड्याचा झोपडपट्टी म्हणून समावेश करणे म्हणजे त्यांच्या ऐतिहासिक ओळखीवर, परंपरेवर आणि पिढ्यानपिढ्या असलेल्या हक्कांवर घाला घालण्याचा प्रयत्न आहे. २०१६ मधील चुकीच्या सीमांकनाची तातडीने दुरुस्ती करावी. कोकण आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल त्वरित मंजूर करून धारावी कोळीवाड्याचे विस्तारित बाह्य सीमांकन निश्चित करावे आणि कोळी समाजाच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करावे.

# लोटे एमआयडीसी प्रदूषणावरून पंकजा मुंडे-प्रमोद जठार वाद

■ मुंबई

**रत्नागिरी** जिल्ह्यातील लोटे एमआयडीसी परिसरातील प्रदूषणाचा प्रश्न आज विधान परिषदेत चांगलाच गाजला. या विषयावरील चर्चेदरम्यान पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आणि भाजपाचेच आमदार प्रमोद जठार यांच्यात शाब्दिक चकमक झाली. आपल्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचा आरोप करत जठार यांनी, माझा दावा चुकीचा ठरला तर महिनाभरापूर्वी मिळालेल्या आमदारकीचाही राजीनामा देण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले.

लोटे एमआयडीसी परिसरातील प्रदूषण, औद्योगिक सांडपाणी आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) योग्य पद्धतीने कार्यरत नसल्याचा मुद्दा जठार यांनी सभागृहात उपस्थित केला. संबंधित उद्योगांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करत त्यांनी सरकारने तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. यावर उत्तर देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, प्रदूषण नियंत्रणासाठी शासन विविध उपाययोजना राबवत आहे. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली राज्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड मोहीम सुरू असून प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने ऑक्सिजन देणारी झाडे लावून ती जगवावी.

# पीएमजीपी इमारतीचा गॅलरीचा भाग कोसळला! म्हाडाची चिंता वाढली

■ मुंबई

**जोगेश्वरी** (पूर्व) पीएमजीपी वसाहतीतील इमारत क्रमांक १७ चा गॅलरीचा भाग कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. यापूर्वी २४ जून रोजी इमारत क्रमांक ५ मधील एका खोलीच्या छताचा स्लॅब कोसळला होता, अशी माहिती म्हाडाचे अधिकारी राहुल व्हटकर यांनी दिली.

येथील पीएमजीपी वसाहत म्हाडाच्या जमिनीवर उभी आहे. यामध्ये एकूण १७ इमारती आहेत. यासर्व इमारती अतिधोकादायक स्थितीत असल्याने पावसाळ्यात एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर इमारतीतील रहिवाशांना खोल्या रिकामी करण्याच्या नोटिसा वारंवार देण्यात आल्या आहेत. त्यांना पर्यायी खोल्या चांदिवली येथे देण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे. मात्र काही रहिवाशांकडून सहकार्य मिळत नाही. ऐन पावसाळ्यात दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण? अशी चिंता म्हाडाला सतावू लागली आहे.

# लोकल हत्या प्रकरणातील चाकू बोरीवलीत सापडला

■ मुंबई



## व्हायरल व्हिडिओच्या मदतीने जप्त केला

**नालासोपारा** लोकल हत्या प्रकरणातील आरोपी रोशन सुवर्णाने हत्येसाठी वापरलेला चाकू अखेर बोरीवली स्थानकात प्लॅटफॉर्म क्र. २ आणि ३ जवळ एका हॉटेल कर्मचाऱ्याला सापडला. आरोपी रोशन सुवर्णाने पळून जाताना हा चाकू फेकून दिला होता. नंतर एका व्हायरल व्हिडिओच्या माध्यमातून माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तो जप्त केला.

आरोपी रोशन सुवर्णा याने पळून जाताना प्लॅटफॉर्म २ व ३ जवळील एका गल्लीत चाकू फेकून दिला होता. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यावर, एका हॉटेल कर्मचाऱ्याने तो चाकू उचलून हॉटेलच्या स्टाफ रूममध्ये ठेवला होता. व्हिडिओ पाहून त्या कर्मचाऱ्याने व हॉटेल मॅनेजरने पोलिसांशी संपर्क साधला आणि बोरिवली येथील तो चाकू पोलिसांच्या हवाली केला. जप्त केलेल्या या चाकूच्या हँडलचा रंग राखाडी असून त्याचे हँडल १२ सेमी आणि ब्लेड १७.५ सेमी लांब आहे. आरोपी सुवर्णाने हा चाकू सात महिन्यांपूर्वी मीरा-भाईंदर येथील ॲमेझॉन गोदामात काम करणाऱ्या तुषार सरवैया नावाच्या मित्राकडून घेतला होता. दरम्यान,काल पोलिसांनी पुढील तपासासाठी आणखी सात दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केल्यानंतर, दंडाधिकारी न्यायालयाने आरोपी रोशन सुवर्णाची पोलीस कोठडी ६ जुलैपर्यंत वाढवली.

# जूनमध्ये जीएसटी संकलनात १४ टक्क्यांची दणदणीत वाढ




■ नवी दिल्ली

**नुकत्याच** सरलेल्या जून महिन्यात मागील वर्षीच्या तुलनेने वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनात १३.९ टक्क्यांची दणदणीत वाढ नोंदवली गेली. जूनमध्ये १.९५ लाख कोटी रुपये इतके जीएसटी संकलन एवढे झाले आहे. देशांतर्गत जीएसटी संकलनात फारशी वाढ न होऊनदेखील एकूण जीएसटी संकलनात मुख्यत्वे आयात शुल्कामुळे ही वाढ झाली आहे.

अधिकृत आकडेवारीनुसार गेल्या वर्षी याच महिन्यात १.७१ लाख कोटी रुपये जीएसटी संकलन झाले होते. मागील वर्षांच्या तुलनेत यावर्षी जून महिन्यात देशांतर्गत जीएसटी संकलनात अवघ्या ६.५ टक्क्यांची वाढ झाली असली तरी आयात केलेल्या मालावरील जीएसटी संकलनात ३४.६ टक्क्यांच्या दणदणीत वाढ होऊन हा आकडा ६०,०३८ कोटी रुपयांवर गेला आहे.

कर परताव्याच्या वजावटीनंतर निव्वळ जीएसटी संकलन ११.२ टक्क्यांच्या वाढीसह १.६२ लाख कोटी रुपये झाले आहे. तसेच कर परताव्याचे प्रमाणही २९.१ टक्के वाढून ३२,४३६ कोटी रुपये झाले आहे. ही रक्कम मागील वर्षीच्या तुलनेत २९.१ टक्के जास्त आहे.

# मुंबईतील सर्व रस्त्यांवर फक्त २७ खड्डे! पालिकेचा अजब दावा

## खड्डे बुजविण्यासाठी ३ कोटी खर्च करणार

■ मुंबई

**पावसाळ्याच्या** तोंडावर मुंबईतील रस्त्यांवर केवळ २७ खड्डे असल्याचा अजब दावा मुंबई महापालिकेने केला आहे. विशेष म्हणजे पालिका शहरातील २६ वॉर्डातील ६ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेणार असून त्यासाठी तब्बल ३ कोटी रुपये खर्च करणार आहे.



पालिका प्रशासनाने म्हटले आहे की,१० जून ते २५ जून या १५ दिवसांत मुंबईच्या रस्त्यांवर फक्त २७ खड्डे असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे आता नागरिकांना रस्त्यावरील खड्ड्यांचा होणारा त्रास कमी करण्यासाठी २६ वॉर्डांमध्ये ६ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. यामध्ये 'हॉट मिक्स' ऐवजी 'कोल्ड मिक्स' डांबर वापरले जाणार आहे. यासाठी डांबर गरम करण्याची आवश्यकता नसल्याने पावसाळी वातावरणातही जलदगतीने खड्डे बुजवणे शक्य होणार आहे.

# बीडमध्ये कार-टू-व्हीलरच्या धडकेत १४ वर्षीय मुलाचा मृत्यू

■ बीड

**माजलगाव** येथील बायपास रोडवर तहसील कार्यालयासमोर भीषण अपघात होऊन १४ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात आणखी दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. करीम खदीर शेख (१४) असे मृत मुलाचे नाव असून, तो आपल्या चुलत भावासह मोटारसायकलवरून छत्रपती संभाजी महाराज चौकाकडे जात होता. त्याचवेळी समोरून येणाऱ्या कारने त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, मोटारसायकलचा अक्षरशः चुराडा झाला. या अपघातात करीमचा जागीच मृत्यू झाला, तर इतर जखमींवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# आजपासून वारकऱ्यांच्या 'चरण सेवेला' प्रारंभ

■ मुंबई


**आषाढी** वारीदरम्यान पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा आणि चरणसेवेचा लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील 'चरणसेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे.

राज्यातील ११ जिल्ह्यांतील पालखी मार्गावरील सुमारे ४०० मुक्कामस्थळी हा उपक्रम राबविण्यात येणार असून, १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज राहणार आहेत.

वारकऱ्यांच्या पायांवरील ताण कमी करण्यासाठी सुमारे ३ हजार लीटर औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायांची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयात पाठवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच गरजेनुसार रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले की, गतवर्षी 'चरणसेवा' उपक्रमातून १ लाख ७५ हजारांहून अधिक वारकऱ्यांना थेट चरणसेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांपेक्षा अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला.

# आता फळ पीक विमा योजनेत नारळ आणि सुपारीचा समावेश



■ सिंधुदुर्गनगरी

**हवामानावर** आधारित फळ पीक विमा योजनेत फळबागांच्या सुरक्षेसाठी राज्य शासनाकडून नारळ आणि सुपारी या दोन पिकांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे आंबा पिकासाठी असलेला विम्याचा कालावधीही आता १५ मेवरून ३१ मेपर्यंत वाढविण्यात आला आहे, अशी माहिती सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मनीष दळवी यांनी दिली.

मनीष दळवी यांनी सांगितले की,पुनर्रचित हवामानावर आधारित फळ पिक विमा योजनेंतर्गत शासनाने जिल्ह्यातील बागायतदारांच्या दृष्टीने महत्त्वाचे हे दोन सुधारित बदल केले आहेत. आतापर्यंत या योजनेंतर्गत कोकणातील आंबा, काजू व केळी या तीन पिकांनाच विमा संरक्षण दिले जात होते. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर लागवड असलेली नारळ व सुपारी ही पिके मात्र विम्याच्या कार्यक्षेत्रात येत नव्हती. त्यामुळे किनारपट्टी भागातील बागायतदार या योजनेपासून वंचित राहत होते. बदलत्या हवामानाचा विपरीत परिणाम या पिकांवर होत असल्याने त्यांनाही विमा संरक्षणाची नितांत गरज होती. हवामानातील अनपेक्षित बदल, अवेळी पाऊस, गारपीट किंवा दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षणाचा लाभ मिळतो. नारळ बागायतदारांसाठी केंद्र शासनामार्फत नारळ पाम विमा योजना देखील राबवली जाते. तरी जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी सदर पीक विमा योजनेत सहभाग घेऊन आपली फळबागायती विमा संरक्षित करावी, असे आवाहन अध्यक्ष मनीष दळवी यांनी केले आहे.

# कराडचा बहुचर्चित उड्डाणपूल हलक्या वाहनांसाठी खुला

■ कराड

**पुणे-बंगळुरु** राष्ट्रीय महामार्गावरील कराड येथील बहुप्रतिक्षित सहापदरी उड्डाणपुलाच्या सातारा-कोल्हापूर आणि कोल्हापूर-सातारा या दोन्ही मार्गिका हलक्या वाहनांसाठी खुल्या करण्यात आल्या आहेत.

काही महिन्यांपासून उड्डाणपुलाचे काम वेगाने सुरू आहे. पूल वाहतुकीसाठी पूर्णपणे सुरक्षित आहे का? याच्या तपासणीसाठी महामार्ग प्राधिकरणाकडून गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या स्तरांवर तांत्रिक चाचण्या घेतल्या जात आहेत. गेल्या आठवड्यात कोल्हापूरकडे जाणारी मार्गिका चाचणीसाठी काही दिवसांसाठी खुली केली होती. मात्र, पुढील तांत्रिक तपासणीसाठी ती पुन्हा बंद केली. काल दुपारी १२ नंतर दोन्ही बाजूंच्या मार्गिका खुल्या करून त्याची चाचणी घेण्यात आली. पुलाच्या अंतिम उद्घाटनाच्या दृष्टीने चाचणी महत्त्वाची आहे. साताऱ्याहून कोल्हापूरकडे जाणारी तसेच कोल्हापूरकडून सातारा बाजूकडे जाणाऱ्या मार्गिकेवर एकाच वेळी चाचणी घेतली जात आहे. सध्या केवळ मोटार, दुचाकीसारख्या हलक्या वाहनांनाच पुलावरून प्रवेश दिला आहे.

SIES HIGH SCHOOL, MATUNGA
K.A. Subramaniam Road, Matunga, Mumbai 400019
(Government-Aided Private Minority English Medium School)
SIES RISE WITH EDUCATION
Applications are invited for the following posts of
**Shikshan Sevak** (3 Years)
for the Academic Year 2026-2027in the
Government-Aided Private Minority English Medium School.

| Sr. No. | Group (Class/Std.) | Educational & Professional Qualification | Subject | Medium | No. of Posts | Remuneration (Per Month) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Std. IX-X | B.A. / B.Sc./ B.P.Ed. | Physical Education (P.E.) | English | 01 | ₹ 18,000/- |
| 2 | Std. VI - VIII | B.Sc., D.Ed. / B.Ed., TET / CTET | Mathematics/ Science | English | 01 | ₹ 16,000/- |
| 3 | Std. V | H.S.C., D.Ed., TET / CTET | All Subjects | English | 01 | ₹ 16,000/- |

How to Apply
Applicants should apply within 7 days to: SIES High School, Matunga, K.A. Subramaniam Road, Matunga, Mumbai 400019.
Interested candidates are required to send their CV to:
Email: sieshighschool1932@gmail.com
CC to: hrcommunications@sies.edu.in

# दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर अपघात! ८ जणांचा मृत्यू

■ दौसा

**राजस्थानातील** दौसा जिल्ह्यातील दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर मध्यरात्री बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. या सहा प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला तर डोक्याला गंभीर दुखापत झालेल्या आणखी दोघांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत २१ जण जखमी झाले असून, अनेकांची प्रकृती गंभीर आहे.

कोलवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धनावडा परिसरात उत्तराखंडमधील ऋषिकेशहून मध्य प्रदेशातील इंदूरकडे निघालेल्या 'हंस ट्रॅव्हल्स'च्या स्लीपर बस आणि ट्रकची धडक झाली. धडकेनंतर बस रस्त्यालगतच्या खड्ड्यात कोसळली. त्याचवेळी बसच्या मागील भागात भीषण आग भडकली आणि काही क्षणांत संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली.बसमध्ये एकूण ३९ प्रवासी होते. अनेक प्रवासी झोपेत असल्याने त्यांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. आगीच्या ज्वाळांनी बस वेढल्याने प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी जीवाची पर्वा न करता बचावकार्य सुरू केले. त्यानंतर पोलीस, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. जखमींना तातडीने दौसा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर जखमींना पुढील उपचारांसाठी विशेष रुग्णालयात हलवले असून प्रशासनाने 'ग्रीन कॉरिडॉर' तयार करून त्यांना त्वरित उपचार मिळतील याची व्यवस्था केली.



# मुलांच्या सुरक्षेसाठी ऑस्ट्रेलिया कठोर! टेक कंपन्यांना दंड

■ कॅनबेरा

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

१६ वर्षाखालील मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेसाठी ऑस्ट्रेलिया सरकारने सोशल मीडिया कंपन्यांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. वयोमर्यादेच्या नियमांचे पालन न करणाऱ्या टेक कंपन्यांवर कमाल ६६० कोटी रुपयांपर्यंत दंड आकारण्याची तयारी सुरू असून, अल्पवयीन मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवण्यासाठी कंपन्यांनी कोणती पावले उचलली, याचाही सरकारकडून जाब विचारला जाणार आहे.

१६ वर्षाखालील मुलांसाठी सोशल मीडियावर वयोमर्यादा लागू करणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिला देश ठरला असला, तरी या कायद्याचा अपेक्षित परिणाम दिसून आलेला नाही. त्यामुळे सरकारने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या टेक कंपन्यांवरील कमाल दंड वाढवून ६६० कोटी रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे.

देश विदेश

# रशियात विद्यार्थ्यांना वार्षिक १७ तास लष्करी प्रशिक्षण

■ मॉस्को

**युक्रेनविरुद्ध** गेली सुमारे दोन वर्षांपासून सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इयत्ता ६ वी ते ११ वीच्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षात किमान १७ तासांचे प्राथमिक लष्करी प्रशिक्षण घेणे बंधनकारक करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

रशियन सरकार विद्यार्थ्यांसाठी मातृभूमीची सुरक्षा आणि संरक्षण या विषयाचे प्राथमिक शिक्षण देणारा एक अभ्यासक्रम राबवते.या अभ्यासक्रमाच्या ढाच्यात आता बदल करण्यात आला आहे. त्यानुसार या अभ्यासक्रमात ५० टक्के हिस्सा लष्करी प्रशिक्षणाचा असणार आहे. १ सप्टेंबरपासून हा बदल लागू होणार आहे. यामध्ये लष्करी कारवायांची प्राथमिक माहिती विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे.

# ३ दशकांनंतर यमुना पाणीवाटप तिढा सुटला! राजस्थान-हरियाणात करार

■ नवी दिल्ली

**तब्बल** तीन दशकांपासून रखडलेल्या यमुना नदीच्या पाणीवाटपाच्या प्रश्नावर अखेर तोडगा निघाला असून, राजस्थान आणि हरियाणा सरकारने सोमवारी ऐतिहासिक सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षऱ्या केल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या करारामुळे सुमारे ३४ हजार कोटी रुपयांच्या यमुना जल प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पाद्वारे हरियाणातील हथिनीकुंड बॅरेजमधून भूमिगत पाइपलाइनद्वारे राजस्थानच्या वाट्याचे यमुनेचे पाणी पोहोचविण्यात येणार असून, दोन्ही राज्यांतील पाणीटंचाईग्रस्त भागांना दिलासा मिळणार आहे.

१९९४ मधील अपर यमुना नदी मंडळ कराराच्या अंमलबजावणीला अखेर गती मिळाली असून, या करारानुसार राजस्थानच्या वाट्याचे ५७७ ते ५८० दशलक्ष घनमीटर (एमसीएम) यमुना नदीचे पाणी हरियाणातील हथिनीकुंड बॅरेजपासून चुरू जिल्ह्यातील हंसियावास जलाशयापर्यंत सुमारे २९५.५ किमी लांबीच्या भूमिगत पाइपलाइनद्वारे पोहोचविण्यात येणार आहे. सुमारे ३४ हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पात ३.६ मीटर व्यासाच्या तीन पाइपलाइन, कृत्रिम जलाशय आणि आधुनिक जलव्यवस्थापन प्रणाली उभारली जाणार आहे.

# प.बंगालच्या बँकेत ड्रेसकोड नोटीस सोशल मीडियावर व्हायरल

■ कोलकाता

**युनायटेड** कमर्शियल (युको) बँकेच्या पश्चिम बंगालमधील एका शाखेच्या मुख्य दरवाजावर चिकटवण्यात आलेली नोटीस सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. यात हाफ पँट आणि मॅक्सी असे कपडे घालून बँकेत न येण्याची सूचना ग्राहकांना उद्देशून दिली आहे.

या नोटिशीचा फोटो कोणीतरी सोशल मीडियावर शेअर केला आहे. त्यावर उलट सुलट प्रतिक्रिया येत आहेत.... मग काय लुंगी घालून यायचे का, असा मिश्किल सवाल एका वापरकर्त्याने विचारला. तर एका वापरकर्त्याने बँकेच्या या निर्णयाची पाठराखण करत बँकेची शाखा हेदेखील एक कार्यालय आहे. त्यामुळे कार्यालयात जसे सभ्य माणसांसारखे वावरतो, तसेच बँकेतही वावरले पाहिजे, असे या वापरकर्त्याचे म्हणणे आहे.

# अतिलठ्ठ मुलाच्या मृत्यूनंतर पालकांवर गुन्हा दाखल

■ मिशिगन

**मिशिगनमधील** २५५ पाउंड (११६ किलोग्रॅम) वजन असलेल्या ७ वर्षांच्या मुलाच्या मृत्यूनंतर त्याच्या पालकांवर हत्या, छळ आणि बाल अत्याचाराचे आरोप ठेवून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कॅस्पर ओब्रायन असे या मुलाचे नाव आहे. कॅस्परचा श्वास थांबल्याने फ्लिंटमधील त्याच्यावर घरी आपत्कालीन उपचार सुरू होते. त्यानंतर गेल्या नोव्हेंबरमध्ये त्याचा मृत्यू झाला. त्याचे आई-वडील डॅमियन ओ'ब्रायन आणि जेसिका ओ'ब्रायन यांच्यावर प्रत्येकी द्वितीय-श्रेणी हत्या, छळ आणि द्वितीय-श्रेणी बाल अत्याचाराचे तीन आरोप ठेवण्यात आले आहेत. जेनेसी काउंटीचे सरकारी वकील डेव्हिड लेटन म्हणाले की, पालक मुलाला चुकीच्या पद्धतीने खाऊ घालत होते. कॅस्परने फक्त सतत स्नॅक फूड्स खाल्ले होते. त्याला आवश्यक असलेले पोषण मिळत नव्हते. बोलू न शकणाऱ्या आणि अंथरुणाला खिळलेल्या कॅस्परला गंभीर व्रण आणि शरीरावर विविध प्रकारचे पुरळही उमटले होते. कुटुंबाकडे आरोग्यसेवा उपलब्ध असूनही पालकांनी कॅस्परला उपचारासाठी नेले नाही. गेल्या आठवड्यात त्या जोडप्याला न्यायालयात हजर करण्यात आले. त्यानंतर जेनेसी काउंटीतील तुरुंगात त्यांना जामीन न देता ठेवण्यात आले आहे. या प्रकरणाची गुरुवारी संभाव्य कारण सुनावणी होणार आहे.



जेनेसी काउंटी वैद्यकीय परीक्षकाच्या अहवालानुसार, ४ फूट २.५ इंच उंचीच्या त्या मुलाला वैद्यकीयदृष्ट्या लठ्ठ म्हणून वर्गीकृत करण्यात आले होते. त्याच्या मृत्यूचे कारण डायलेटेड कार्डिओमायोपॅथी असे नमूद केले होते. हृदय मोठे आणि कमकुवत होते आणि कार्यक्षमतेने रक्त पंप करू शकत नाही. तसेच फुफ्फुसांसह शरीरातील इतर प्रणालींवर परिणाम होतो, तेव्हा डायलेटेड कार्डिओमायोपॅथी होते.

# कोकणात मुसळधार पाऊस! राज्यभर अलर्ट

पान ८ वरून

कापलेल्या डोंगराची माती आणि दगड महामार्गावर कोसळले. या घटनेमुळे महामार्ग बंद झाला. महामार्ग प्राधिकरणाने जेसीबीच्या साहाय्याने ढिगारा हटविल्यानंतर सुमारे तासाभराने वाहतूक सुरळीत झाली.

रायगड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असून सावित्री, कुंडलिका,अंबा, पाताळगंगा, उल्हास, गाढी या नद्यांच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. अतिवृष्टीमुळे ठिकठिकाणी वीजपुरवठा खंडित होणे, झाडे पडणे, पाणी साचणे यासारखे प्रकार घडले.

पावसामुळे मुंबई, नवी मुंबई आणि वरळी परिसरातील अनेक रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला. अंधेरी सबवे, मालाड सबवे, जोगेश्वरी, कुर्ला, मुलुंड, कांजूरमार्ग, गोरेगाव फिल्मसिटी रोड आणि संतोषनगर परिसर येथे पाणी साचल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. गोरेगाव फिल्म सिटी रोडवर काही ठिकाणी दोन ते तीन फूट पाणी साचल्यामुळे वाहतूक काही काळासाठी बंद करण्यात आली. मालाड सबवेमध्ये सुमारे एक फूट पाणी साचल्याने पश्चिम उपनगरातील वाहतुकीचा वेग मंदावला. मालाड सबवेबाहेरील मुख्य नाल्याचे लोखंडी झाकण तुटल्यामुळे पाण्याचा निचरा अडखळला आणि वाहतूक कोंडी अधिक वाढली. कल्याण-डोंबिवलीत रात्रभर कोसळलेल्या मुसळधार पावसाने सगळीकडे दाणादाण उडाली. अवघ्या २४ तासांत ८८.८ मिमी पावसाची नोंद झाली तर शहरातील विविध भागांत १८ हून अधिक झाडे उन्मळून पडली. यामध्ये अनेक वाहनांचे नुकसान झाले, उच्चदाब वीजवाहिन्यांवर झाडे कोसळल्याने काही भागांचा वीजपुरवठा खंडित झाला, तर मालंग रोडसह अनेक प्रमुख मार्गांवर वाहतूक विस्कळीत झाली. वसई-विरारमधील जनजीवन विस्कळीत झाले. वसई पूर्वेतील राजावळी-वाघराळ पाडा परिसरात पाण्याच्या प्रचंड प्रवाहात दोन चारचाकी गाड्या वाहून गेल्या. त्यापैकी एका कार चालकाने वेळेत बाहेर उडी मारल्याने त्याचा जीव थोडक्यात बचावला. तर नेरूळ येथील एल.पी. ब्रिजखाली शॉर्टसर्किट होऊन पाण्यात विद्युतप्रवाह पसरला. यावेळी तेथून जाणाऱ्या दोन कॉलेज तरुणींना विजेचा धक्का बसला आणि त्या पाण्यात कोसळल्या. नागरिकांनी तातडीने मदत करत दोघींना रिक्षातून डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार केले.



मुसळधार पावसामुळे पवई तलाव भरून वाहू लागला (छाया-दीपक साळवी)

दक्षिण मुंबईतील वाळकेश्वर येथे म्हाडाच्या इमारतीची बाल्कनी कोसळून ५१ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला, तर ईस्टर्न फ्रीवेवर दोन एसयूव्हींची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. तसेच मंत्रालय शासकीय बंगल्यांमध्ये काही काळ वीजपुरवठा खंडित झाला. दरम्यान, पवई तलाव पहाटे पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागला असून, सातही तलावांतील पाणीसाठ्यातही लक्षणीय वाढ झाली आहे.

बुलडाणा जिल्ह्यात गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार आणि मुसळधार पावसाने जनजीवनासह शेतीला मोठा फटका बसला. मेहकर तालुका, धाड, जामठी, वरुड, सोयगाव, ब्रह्मपुरी, दुधा आणि रायपूर परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाणगंगा नदीसह अनेक नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले, तर शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली. अनेक शेतांमध्ये पाणी साचल्याने शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले आहे. दुसरीकडे, सुरू असलेल्या रस्ते कामांदरम्यान कच्चे पूल आणि भराव वाहून गेल्याने काही गावांचा संपर्कही विस्कळीत झाला. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांतही मुसळधार पाऊस झाला.

# देशातील २३ राजकीय पक्षांनी सरन्यायाधीशांना पाठवले पत्र

पान १ वरून

विरोधी पक्ष 'एकजूट, ऐक्य आणि प्रतिकार' या आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. न्यायाधीशांना पाठवलेल्या या पत्रावर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी, लोकमत राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, डाव्या पक्षांचे नेते तसेच अपक्ष खा. कपिल सिब्बल यांच्यासह अनेक नेत्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जाहीर निवेदन

महावितरण

| | | | |
|---|---|---|---|
| कार्यकारी अभियंता, सं व सु डोंबिवली (ना) विभाग, अण्णासाहेब काळे ८८७९६२६५५५ | | | |
| अतिरिक्त कार्यकारी अभियंता, दे व म डोंबिवली (पूर्व) उपविभाग, अभिजित दिवटे ८८७९६२६७८० | | | |
| देयके व महसूल विभाग (४१६६) | | देयके व महसूल विभाग (४७२०) | |
| प्रवीण राऊत, सहाय्यक अभियंता | | मोनीलाता इंगळे, कनिष्ठ अभियंता | |
| रवींद्र जमघरे, सहाय्यक लेखापाल | | स्वप्नील कुलकर्णी, सहाय्यक लेखापाल | |
| तक्रारी साठी ईमेल/ Whats app No. 4166billing@gmail.com ९५९४०२२३१० | | तक्रारी साठी ईमेल/ Whats app No. Sdo4720@gmail.com ९५९४०२२३२० | |
| पेंडसे नगर नागरी शाखा | रामनगर नागरी शाखा | टिळक नगर नागरी | मानपाडा रोड नागरी शाखा |
| बाजीप्रभू चौक | तुकाराम नगर | गोग्रासवाडी | गांधीनगर पूर्व |
| कार्यकारी अभियंता, सं व सु डोंबिवली (ना) विभाग, अण्णासाहेब काळे ८८७९६२६५५५ | | | |
| अतिरिक्त कार्यकारी अभियंता, दे व म डोंबिवली (पश्चिम) उपविभाग, सुनील गौंड (अतिरिक्त कार्यभार)८८७९६२६९४१ | | | |
| देयके व महसूल विभाग (४१६७) | | देयके व महसूल विभाग (४७६८) | |
| प्रदीप चौधरी, सहाय्यक अभियंता | | निकिता माने, कनिष्ठ अभियंता | |
| अश्विनी लोखंडे, सहाय्यक लेखापाल | | अश्विनी लोखंडे, सहाय्यक लेखापाल – | |
| तक्रारी साठी ईमेल/ Whats app No. sdo_4167@yahoo.in ९५९४००६७८० | | तक्रारी साठी ईमेल/ Whats app No. sdo4768@yahoo.com ९५९४००७६६० | |
| गुप्तेरोड नागरी शाखा | उमेशनगर नागरी शाखा | जुनी डोंबिवली नागरी शाखा | कोपर रोड नागरी शाखा |
| नवापाडा | | गांधीनगर (पश्चिम ) | |

कार्यकारी अभियंता, डोंबिवली (ना) विभाग म.रा.विज.वितरण कं.मर्यादित

# कामोठे परिसरात बेडरूमचा स्लॅब कोसळून एकाचा मृत्यू

■ पनवेल

**कामोठे** येथील सेक्टर १० मधील साई सिद्धी सोसायटीतील घराच्या बेडरूमचा स्लॅब आज सकाळी कोसळल्याने ४५ वर्षीय सुरेश लोखंडे यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांची १२ वर्षीय मुलगी वेदिका लोखंडे जखमी झाली.

कामोठे सेक्टर १०, प्लॉट क्रमांक ६१ येथील ६ मजली साई सिद्धी सोसायटीतील फ्लॅट क्रमांक १०१ मध्ये सुरेश लोखंडे कुटुंबासह वास्तव्यास होते. सकाळी सहा वाजता सुरेश लोखंडे आणि त्यांची मुलगी वेदिका बेडरूममध्ये झोपलेले असताना छताच्या स्लॅबचा काही भाग अचानक कोसळला आणि स्लॅबचा मोठा भाग सुरेश लोखंडे यांच्या छातीवर आणि शरीरावर पडल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर मुलगी वेदिकाच्या अंगावरही स्लॅबचा काही भाग पडल्याने ती जखमी झाली. घटनेची माहिती मिळताच सोसायटीतील रहिवाशांनी तातडीने बचावकार्य करत दोघांना रुग्णालयात हलविले. मात्र डॉक्टरांनी सुरेश लोखंडे यांना मृत घोषित केले. वेदिका हिच्यावर कामोठेच्या एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे सूचना देण्यात येते की, श्रीमती लता प्रत्तिदाथु वर्गीस उर्फ कुमारी लता मूलचंद वासवानी, (दिवंगत पितृपक्षीय काका श्री. भोजराज केवलराम वासवानी यांच्या पुतणी, नामनिर्देशित व्यक्ती आणि एकमेव हयात कायदेशीर वारस) या सेल्फ हेल्प को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड (सिंधी सोसायटी), सेंट फ्रान्सिस रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६ च्या तळमजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३, ब्लॉक क्र. "ए", सेल्फ हेल्प को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड, सिंधी सोसायटी, सेंट फ्रान्सिस रोड, क्षेत्रफळ अंदाजे ३५० चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळच्या विद्यमान मालक आहेत. या संस्थेने १९६२-१९६५ या काळात जमिनीचा भूखंड स्वतः विकसित केला असून, सी.टी.एस. क्र. १५५०, महसुली गाव विलेपार्ले (पश्चिम), तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा येथील; आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "के-(पश्चिम) प्रभागांतर्गत मूल्यांकित करण्यात आलेल्या जमिनीच्या भूखंडावर प्रवर्तक सदस्या(स्यां)ना सदनिकांचे वाटप केले होते आणि विद्यमान मालक/प्रस्तावित विक्रेत्या/हस्तांतरणकर्ता यांच्याकडे वर्ष १९९१ पासून सोसायटीच्या संमतीने व परवानगी/ना-हरकत प्रमाणपत्रासह या सदनिकेचा ताबा सांभाळत असून त्यांनी सदर सदनिका क्र. ३, ब्लॉक क्र. "ए", तळमजला या सदनिकेचा रिक्त आणि अखंड प्रत्यक्ष ताबा आणि भाग प्रमाणपत्र क्र. २९ (सध्या हरवले आणि/किंवा गहाळ झाल्याचे दिसून येते) अंतर्गत समाविष्ट असलेले डिस्टिंक्टिव्ह क्रमांक १४१ ते १४५ असलेल्या ५ (पाच) समभागांच्या लाभांसह त्यांचे लाभार्थी हक्क, शीर्षक, हितसंबंध, दावा, भविष्यातील हक्कांची विक्री, अभिहस्तांकन आणि/किंवा हस्तांतरण करण्याचे मान्य केले आहे.

विद्यमान सदस्य दिवंगत श्री. भोजराज केवलराम वासवानी यांचे नामनिर्देशित व्यक्ती सह केवळ कायदेशीर वारस या त्यांच्या क्षमतेमध्ये सदनिका क्र. ३, ब्लॉक "ए" संबंधी सदस्यता तसेच भोगवटा अधिकारांवर दावा करीत आहेत.

विक्रेत्या/हस्तांतरणकर्त्या (दिवंगत पितृपक्षीय काका श्री. भोजराज केवलराम वासवानी यांची एकमेव हयात कायदेशीर वारस असलेली एकमेव पुतणी) यांनी संस्थेच्या दिवंगत सदस्यांच्या एकमेव हयात कायदेशीर वारस आणि/किंवा कायदेशीर प्रतिनिधी या क्षमतेमध्ये संस्थेची सदस्यता तसेच मालकी हक्क आणि वर्ष १९८६ पासून अखंड ताब्याचा दावा केला आहे आणि संस्थेमधील सदर जागेसंबंधी प्रमाणबद्ध देखभाल देणी आणि बृ.मुं.म.पा.चा प्रमाणबद्ध मूल्यांकन कराचे योगदान दिले आहे आणि विद्यमान मालक सदर जागेशी संबंधित त्यांचे लाभार्थी हक्क, शीर्षक, दावा, हक्क आणि हितसंबंध व त्यासह सदर संस्थेच्या सदस्यतेसंबंधी लाभ आणि पाच समभाग आर्थिक मोबदल्याकरिता माझ्या अशिलाच्या नावे विक्री आणि/किंवा हस्तांतरित करण्याची बोलणी करीत आहेत.

त्यामुळे जनतेचा कोणीही सदस्य किंवा अधिकारी यांचा मौल्यवान आर्थिक मोबदल्याच्या बदल्यात माझ्या अशिलांच्या नावे, विक्री/हस्तांतरण करारपत्र बनविणाऱ्या सदर विद्यमान मालकांविरुद्ध, विक्री, भेट, भाडेपट्टी, गहाणवट, प्रभार, देवाणघेवाण, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेकरू किंवा कायमस्वरुपी भाडेपट्टी, उत्तराधिकार किंवा उत्तराधिकार कायद्याअंतर्गत कोणताही कायदेशीर दावा किंवा कोणताही दिवाणी किंवा गुन्हेगारी खटला किंवा संबंधित कायद्यांतर्गत नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकरणाद्वारे जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुली प्रक्रिया या मार्गे कशाही आणि काहीही पद्धतीने कोणताही असलेला आक्षेप किंवा दावा कायदेशीर कागदोपत्री पुराव्यासह याखाली नोंदविलेल्या पत्त्यावर निम्नस्वाक्षरीकार यांना सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे, असे न केल्यास माझे अशील (प्रस्तावित खरेदीदार/हस्तांतरण स्वीकारकर्ता) असे कोणतेही दावे किंवा प्रक्रिया किंवा आक्षेप (जर असल्यास) दुर्लक्षित करून संपूर्ण मंजूर मोबदला प्रदान करून व्यवहार पूर्ण करतील आणि संस्थेचे विक्री हस्तांतरण ना हरकत प्रमाणपत्र तसेच सदर सदनिकेचा रिक्त ताबा तसेच संस्था हस्तांतरण (नाव नोंदणी) औपचारिकता सुरू करतील आणि असा कोणताही कायदेशीर दावा(वे) जर असल्यास सोडून दिले किंवा त्याग केले असे समजण्यात येईल.

दिनांकः २ जुलै, २०२६

सही/-

**फाल्गुनी अभय पटेल**

ॲडव्होकेट

३/ए, सुमंगल अपार्टमेन्ट, वल्लभभाई पटेल रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६.

## जाहीर नोटीस

**क्र. आरटीएस/अपिल/क्र. २६९/२५ ॲडमिशन**
**दिनांक :- १६/०६/२०२६**

१. श्री. बेंजामिन अतुल हटचिन्स राहणार १२२७०, मंडरीन रोड, जॅक्सन व्हील, एफएल ३२२२३,युनायटेड स्टेट ऑफ अमेरीका तर्फे सी.ए. महिपाल सोहन दुलगच

२. श्रीम. इना तेरेसा हटचिन्स राहणार १२२७०, मंडरीन रोड, जॅक्सन व्हील, एफएल ३२२२३,युनायटेड स्टेट ऑफ अमेरीका तर्फे सी.ए. महिपाल सोहन दुलगच

**अपिलार्थी**

**विरुध्द**

१. गुलाम रसुल पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
२. असिफ पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
३. अश्पाक पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
४. अशरफ पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
५. जुबेर पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
६. अंजुम पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
७. कमिल पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
८. अमाबिया पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
९. असमत पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
१०. बिलाल पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
११. गुलशन पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
१२. फरझान पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
१३. अश्पाक गुलाम रसुल पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
१४. अशरफ गुलाम रसुल पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
१६. नुरस् बा जुबैर पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
१७. तारानुम जुबैर पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
१८. अंजूम गुलाम रसुल पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
१९. कमिन गुलाम रसुल पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
२०. बिलाल गुलाम रसुल पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
२१. तबस्सुम अस्मत पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
२२. नेहा अस्मत पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
२३. गुलाम अस्मत पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
२४. गुलशन गुलाम रसुल पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
२५. फरझान गुलाम रसुल पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
२६. साजिद सफ पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
२७. जुल्फी असिफ पटेल राहणार काशी, ता. व जि. ठाणे
२८. सुबिन अमिन वांगे राहणार काशी, ता. व जि. ठाणे

**सामनेवाले**

उपविभागीय अधिकारी ठाणे, विभाग ठाणे यांचेकडील आदेश आरटीएस अपिल क्र. ००१८५/२०२३ दि.०३/०९/२०२५ च्या निर्णयाविरुद्ध अपिलार्थी यांनी इकडील अर्धन्यायिक न्यायालयात अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाची विलंबाच्या मुद्दयावर सुनावणी अपर जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कोर्टात ठाणे येथे दि. ०८/०७/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेवणेत आली आहे. तरी सदरचे सुनावणीस अपिलार्थी व सामनेवाले यांनी त्यांचे कायदेशीर सल्लागारासह हजर राहावे. हजर न राहिल्यास त्यांना काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन त्यांचे गैरहजेरीत सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल, याची कृपया नोंद घ्यावी ·

**ठिकाण :- ठाणे**
**दिनांक :- ०६/०७/२०२६**
**माझ्या सही व शिक्क्याने**

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य**

**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे**

सारथी मुख्यालय, सीटी सर्वे नंबर १७३, बी/१, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

| | | | |
|---|---|---|---|
| Email ID : sarthipune@gmail.com | CIN-U74999PN2018NPL177394 | Website: www.sarthi-maharashtragov.in | 020-25592502 |

**जा.क्र. सारथी / कृषि विभाग**/Com No. 2749063 /२०२६ / १४८५ **दिनांक**- ०१/०७/२०२६

## * जाहिरात *

**राज्यातील लक्षित गटातील शेतकरी/युवक/युवती यांना छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे प्रायोजित कृषि विज्ञान केंद्राद्वारे अल्प मुदतीची कृषि तंत्रज्ञान प्रशिक्षण घेणेकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा समाजातील शेतकरी/ युवक/युवती यांना सारथी संस्थेच्या खर्चाने राज्यातील कृषि विज्ञान केंद्राद्वारे **अल्प मुदतीची कृषि तंत्रज्ञान प्रशिक्षणे** देण्यात येणार आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील शेतकरी/ युवक/युवती यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्रतेसाठीचे आवश्यक निकष, अटी शर्ती सारथी पुणे संस्थेच्या पुढील संकेतस्थळावर पाहा. लिंक : https://sarthi.maharashtragov.in/> सुचना फलक > प्रशिक्षण सन २०२६ - २७ माहिती अर्ज > **कृषि विज्ञान केंद्राद्वारे अल्प मुदतीचे कृषि तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम** पहावे.

ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख : **३१.१२.२०२६ (सायंकाळी ६.१५ पर्यंत)**

कागदपत्रे हार्ड कॉपी सारथी संस्थेच्या संबंधित विभागीय कार्यालयास पाठविण्याची मुदत : ऑनलाईन अर्ज सादर केलेनंतर **१० दिवसांचे आत**

सदरविषयी भविष्यात कोणतीही माहिती / सूचना उपरोक्त लिंकवरच दिली जाईल. त्याकरिता इच्छुक उमेदवारांनी सारथीच्या उपरोक्त संकेतस्थळावरील सूचना फलक पहावे.

**सही/-**
**(महेश पाटील) (भा.प्र.से.)**
**व्यवस्थापकीय संचालक,**
छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/ क्र.-५/ सी १४३०

# 'द प्राईड ऑफ भारत'मध्ये मोठा बदल

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या देदिप्यमान जीवनावर आधारित 'द प्राईड ऑफ भारत: छत्रपती शिवाजी महाराज' या आगामी ऐतिहासिक चित्रपटाच्या गोटातून एक मोठी बातमी समोर आली आहे. या भव्य चित्रपटात आता राष्ट्रीय पुरस्कार विजेते संगीतकार अमित त्रिवेदी यांची एन्ट्री झाली आहे. प्रसिद्ध संगीतकार प्रीतम यांनी व्यावसायिक आणि मुख्य प्रवाहातील चित्रपटांमधून काही काळ विश्रांती घेण्याचा निर्णय घेतल्यामुळे, त्यांच्या जागी अमित त्रिवेदी यांच्याकडे या ऐतिहासिक महानाट्याच्या संगीताची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. संदीप सिंग यांच्या






दिग्दर्शनाखाली साकारत असलेल्या या चित्रपटात 'कांतारा' फेम अभिनेता ऋषभ शेट्टी छत्रपती शिवाजी महाराजांची मुख्य भूमिका साकारत आहे.

हा चित्रपट दोन भागांमध्ये प्रदर्शित होणार आहे. अमित त्रिवेदी यांची वाद्यवृंद हाताळण्याची शैली व अस्सल भारतीय सुरांची जाण अप्रतिम आहे. या महाप्रकल्पाचे चित्रीकरण या वर्षाच्या शेवटी सुरू होणार आहे.

# शाहिदला 'विनोदीपटा'चा जॅकपॉट



अभिनेता शाहिद कपूर याने दिग्दर्शक अमित रवींद्रनाथ शर्मा यांच्या 'अदलाबदल' या आगामी विनोदी चित्रपटासाठी स्वाक्षरी केली आहे. या चित्रपटासाठी शाहिदला १८ कोटी रुपये मानधन मिळणार असून, चित्रपटाच्या नफ्यातील काही हिस्साही त्याला दिला जाणार आहे.

हा एक निखळ मनोरंजन करणारा विनोदी चित्रपट असून, याची मुख्य कथा सोल स्वॅपिंग म्हणजेच दोन व्यक्तींच्या आत्म्यांची अदलाबदल या रंजक संकल्पनेवर आधारित असेल. या चित्रपटाच्या निमित्ताने रुपेरी पडद्यावर शाहिद कपूर आणि जान्हवी कपूर ही नवी जोडी पहिल्यांदाच एकत्र काम करताना दिसणार आहे.


या चित्रपटाची निर्मिती सुनीर खेतरपाल हे ॲमेझॉन एमजीएमसोबत करत असून, याचे अधिकृत चित्रीकरण ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार आहे. सध्या या चित्रपटातील इतर महत्त्वाच्या पात्रांची निवड प्रक्रिया सुरू आहे.

# आयुष्मानच्या 'मुपापा'ची अधिकृत घोषणा

यशराज फिल्म्स आणि पोशम पा पिक्चर्स यांच्या पहिल्या संयुक्त व्यावसायिक भागीदारी अंतर्गत तयार होत असलेल्या आगामी चित्रपटाचे नाव 'मुपापा' असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. या चित्रपटात अष्टपैलू अभिनेता आयुष्मान खुराना मुख्य भूमिकेत दिसणार असून, हा चित्रपट १९ फेब्रुवारी २०२७ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. हा एक वेगळ्या धाटणीचा आणि खिळवून ठेवणारा सस्पेन्स थ्रिलरपट असेल. 'काला पानी' या गाजलेल्या वेब-सीरिजचे दिग्दर्शन करणारे समीर सक्सेना या चित्रपटाचे दिग्दर्शन करत असून, दिग्दर्शक म्हणून हा त्यांचा पहिलाच मोठा व्यावसायिक चित्रपट आहे. यामध्ये एका सामान्य माणसाची अनपेक्षित आणि आव्हानात्मक संकटाशी सुरू असलेली वेळेविरुद्धची लढाई दाखवण्यात आली आहे.



# प्रियदर्शन-अक्षय नवव्यांदा एकत्र



प्रसिद्ध दिग्दर्शक प्रियदर्शन यांनी 'हेरा फेरी ३' या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे दिग्दर्शन करणार नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर, त्यांच्या चाहत्यांसाठी एक मोठी आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. प्रियदर्शन यांनी बॉलिवूडचा खिलाडी अक्षय कुमारसोबत आपल्या आगामी चित्रपटाची अधिकृत घोषणा केली आहे. हा चित्रपट या जोडीचा एकत्र असा नववा चित्रपट असेल.

'टिप्स' फिल्म्सच्या बॅनरखाली निर्माण होणारा हा चित्रपट एक कॉमेडी थ्रिलर असेल. या चित्रपटाची मूळ कथा स्वत: प्रियदर्शन यांनी लिहिली असून पटकथा ते रोहन शंकर यांच्यासोबत मिळून विकसित करत आहेत. रोहन यांनी यापूर्वी त्यांच्या 'भूत बंगला' या चित्रपटासाठीही काम केले आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण साधारणपणे डिसेंबर २०२६ मध्ये सुरू होण्याची दाट शक्यता आहे.

# सलमान खान 'गॅलेक्सी अपार्टमेंट' सोडणार?

**बॉलिवूडचा** सुपरस्टार सलमान खान आणि त्याचे कुटुंब गेल्या अनेक दशकांपासून वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये वास्तव्यास आहे. मात्र, आता सलमान हे जुने घर सोडून नव्या ठिकाणी जाणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे. खान कुटुंबियांच्या मालकीच्या वांद्रे येथील एका सी-फेसिंग भूखंडाच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाला महत्त्वपूर्ण मंजुरी मिळाल्यामुळे या चर्चांना उधाण आले आहे. महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीने (एमसीझेडएमए) या मालमत्तेच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाला मंजुरीसाठी शिफारस केली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे.



वांद्रे (पश्चिम) येथील या भूखंडावर पूर्वी एक जुनी रचना होती, जी आवश्यक परवानग्या घेऊन आधीच पाडण्यात आली आहे. आता या जागेवर खान कुटुंब ६ मजली आलिशान रहिवासी इमारत बांधण्याचा विचार करत आहे. एप्रिल २०२४ मध्ये गॅलेक्सी अपार्टमेंटबाहेर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर सलमानच्या सुरक्षेत मोठी वाढ करण्यात आली आहे, त्यामुळे त्याच्या घराशी संबंधित प्रत्येक घडामोडीकडे चाहत्यांचे बारीक लक्ष असते. सलमान खान सध्या दिग्दर्शक वंशी पैदीपल्ली यांच्या आगामी चित्रपटाच्या चित्रीकरणात व्यस्त असून, यात नयनतारा मुख्य भूमिकेत आहे आणि दिल राजू या चित्रपटाची निर्मिती करत आहेत.

# 'दामिनी-२' का अवतरला नाही?

**'दामिनी २'** हा चित्रपट का तयार होऊ शकला नाही, यामागची पडद्यामागची कथा अभिनेता सनी देओल याने नुकतीच उघड केली आहे. त्याच्या आगामी 'इक्का' या कोर्टरूम ड्रामा चित्रपटाच्या ट्रेलर लाँचदरम्यान त्याने यावर सविस्तर भाष्य केले.

१९९३ मध्ये आलेल्या 'दामिनी' या अत्यंत गाजलेल्या चित्रपटाचा सिक्वेल (पुढचा भाग) बनवण्यासाठी सनी देओल आणि त्याच्या सहकाऱ्यांनी अनेक वर्षे प्रचंड प्रयत्न केले होते. मात्र, विविध कारणांमुळे हा प्रकल्प प्रत्यक्षात येऊ शकला नाही आणि 'दामिनी २'ची योजना बारगळली. सनी देओलने



सांगितले की, 'दामिनी'नंतर त्याला पुन्हा कधीच वकिलाची भूमिका साकारण्याची किंवा कोर्टरूम ड्रामामध्ये काम करण्याची उत्तम संधी मिळाली नव्हती. जेव्हा 'दामिनी २'चे नियोजन यशस्वी झाले नाही, तेव्हा त्याच्याकडे 'इक्का' या चित्रपटाचा विषय आला व तो या भूमिकेसाठी लगेच तयार झाला.

# पापाराजींवर का भडकली नेहा?

मुंबईत आयोजित एका पुरस्कार सोहळ्यात बॉलिवूड अभिनेत्री नेहा धुपिया अत्यंत संतप्त झाल्याचे पाहायला मिळाले. कार्यक्रमावरून बाहेर पडत असताना काही छायाचित्रकारांनी अयोग्य पद्धतीने तिचे मागून फोटो काढल्याने नेहाचा पारा चढला. तिने सर्वांसमोर या वर्तनाचा तीव्र निषेध केला असून, याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये नेहा धुपिया छायाचित्रकारांना थेट जाब विचारताना दिसत आहे. ती म्हणाली, तुमच्यापैकी एवढ्या बदनामीने मागून फोटो कोण काढत आहे? कोण आहे तो? हे सगळं आधी बंद करा. ती पुढे म्हणाली, माझेच नाही, तर कोणत्याही अभिनेत्रीचे असे फोटो काढायचे नाहीत. आम्ही सांगून सांगून थकलो आहोत. कधी बॅग पुढे करून, कधी पुस्तक पुढे करून तर कधी मागे चालत जाऊन लपण्याचा प्रयत्न करावा लागतो. हे आता अजिबात खपवून घेतले जाणार नाही. आम्ही तुमच्याशी खूप आदराने बोलतो, त्यामुळे तुम्हीही मर्यादा पाळली पाहिजे.



# ग्रीनफिल्ड महामार्गासाठी खारफुटी तोडीला सुरुवात

## डहाणूत स्थानिकांचा विरोध

■ डहाणू

**वाढवण** बंदराला जोडणाऱ्या प्रस्तावित ग्रीनफिल्ड महामार्गासाठी डहाणू तालुक्यातील वरोर परिसरात खारफुटी (तिवरी) आणि अन्य झाडे तोडण्याचे काम बुधवारपासून कडक पोलीस बंदोबस्तात सुरू करण्यात आले.

उच्च न्यायालयाच्या परवानगीनंतर महसूल, वनविभाग आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. या कारवाईला स्थानिक ग्रामस्थ, मच्छीमार, पर्यावरणप्रेमी आणि वाढवण बंदरविरोधी संघटनांनी तीव्र विरोध केला. आंदोलकांनी 'खारफुटी वाचवा', 'वाढवण बंदर रद्द करा' अशा घोषणा देत मुसळधार पावसातही आंदोलन सुरू ठेवले. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा बळी दिला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला.

ग्रीनफिल्ड महामार्गासाठी मंजूर ९ हेक्टर क्षेत्रातील खारफुटी तोडण्याची परवानगी असली तरी निर्धारित क्षेत्राबाहेरील इतर झाडांचीही मोठ्या प्रमाणात तोड होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. दरम्यान, प्रशासनाने ही कारवाई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच सुरू केल्याचे स्पष्ट केले. आंदोलकांनी कायदेशीर लढा सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.

# राष्ट्रीय आरोग्य अभियानातील १५,०१० कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा

■ मुंबई

**राष्ट्रीय** आरोग्य अभियान अंतर्गत राज्यभर कार्यरत असलेल्या १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या १५ हजार १० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या वार्षिक १,१५३.६० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देणारा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी विशेष पाठपुरावा केला. यापूर्वी १४ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार १० वर्षांपेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी या निर्णयात सुधारणा करण्यात आली. तसेच, या कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी निकष निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशी आणि २५ जून २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार नवा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

# मालाडमधील प्राणी दहन सुविधा ११ जुलैपर्यंत बंद

■ मुंबई

**लहान** पाळीव व भटके प्राणी जसे की मांजर, श्वान आदींचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्यासाठी अंत्यविधीची सुविधा महानगरपालिकेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. परंतु वार्षिक देखभाल आणि दुरुस्तीच्या कारणास्तव येत्या २ ते ११ जुलै या कालावधीत मालाड येथील प्राण्यांच्या अंत्यसंस्काराची, दहन सुविधा तात्पुरती बंद ठेवण्यात येणार आहे. प्राणीप्रेमींची गैरसोय टाळण्यासाठी पालिकेने पर्यायी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. दुरुस्ती आणि देखभालीच्या कालावधीत स्मशानभूमीतील यंत्रसामग्रीची स्वच्छता, तपासणी, इत्यादी तांत्रिक कामे केली जाणार आहेत.

या काळात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी मुंबई महापालिकेतर्फे महालक्ष्मी आणि देवनार येथील प्राणी दहन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

# तीर्थाटन योजनेत आता खासगी भागीदारी! एसटीचा मोठा निर्णय

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - एसटी संगे तीर्थाटन' योजनेत आता खासगी पर्यटन संस्थांच्या सहभागाला मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे भाविकांना किफायतशीर दरात सुरक्षित तीर्थयात्रा करता येणार असून, एसटीच्या उत्पन्नातही वाढ होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

प्रताप सरनाईक म्हणाले की, मोठी भांडवली गुंतवणूक न करता मराठी युवक-युवतींना पर्यटन क्षेत्रात व्यवसायाची संधी उपलब्ध होईल. रोजगारनिर्मिती, भाविकांना सुविधा आणि एसटीच्या आर्थिक बळकटीचा दुहेरी उद्देश या योजनेतून साध्य होईल. नव्या धोरणानुसार तीर्थयात्रेदरम्यान लागणाऱ्या सर्व सुविधा 'वन-स्टॉप' पद्धतीने उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. धार्मिक सहलींचे नियोजन, राहण्याची-खाण्याची सोय, चहा-नाश्ता, स्थानिक पर्यटन, मार्गदर्शक, टोल, पार्किंग आणि दर्शन प्रवेश शुल्क या सर्व बाबी खासगी संस्था सांभाळतील. बस सेवा आणि प्रवासी वाहतुकीचे संपूर्ण उत्पन्न एसटी महामंडळाकडेच राहणार आहे. खासगी संस्थांच्या उत्पन्नातील किमान १० टक्के हिस्सा एसटीला देणे बंधनकारक असेल. तसेच ज्येष्ठ नागरिक, महिला आदी घटकांना मिळणाऱ्या सरकारी प्रवास सवलती कायम राहणार असल्याने हा प्रवास खासगी ट्रॅव्हल्सच्या तुलनेत अधिक स्वस्त होणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी निविदा प्रक्रियेद्वारे राज्यातील सहा प्रदेशांसाठी सहा अनुभवी पर्यटन संस्थांची निवड करण्यात येणार असून, प्रकल्प सुरुवातीला दोन वर्षांसाठी प्रायोगिक तत्त्वावर राबवला जाईल.



# एक महिन्याच्या विलंबानंतर आंबोली धबधबा प्रवाहित

■ सावंतवाडी

**तब्बल** एका महिन्याच्या विलंबानंतर आंबोली घाटातील मुख्य धबधबा अखेर काल प्रवाहित झाला. यामुळे आंबोलीच्या वर्षा पर्यटन हंगामाला आजपासून सुरुवात झाली. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मान्सून ६ जून रोजी दाखल झाला. त्यानंतर सलग ३ ते ४ दिवस पाऊस कोसळला होता. मात्र, नंतर पाऊस लांबल्याने जून महिना कोरडा गेला. गेल्या दोन-तीन दिवसांपासून मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून आंबोली परिसरात सतत कोसळणाऱ्या पावसामुळे आंबोली धबधबा प्रवाहित झाला आहे. पावसाचा असाच जोर कायम राहिल्यास येत्या काही दिवसांतच हा धबधबा पूर्ण क्षमतेने प्रवाहित होणार आहे. आंबोली मुख्य धबधब्यासह घाटमार्गातील नांगरतास धबधबा तसेच चौकुळ-कुंभवडे येथील बाबा धबधबा यासह इतर धबधबे सुद्धा प्रवाहित झाले आहेत.

# घाटले गाव परिसरातील बंद घराला लागली आग

■ मुंबई

**चेंबूरच्या** घाटले गाव परिसरातील खारदेवनगर भाजी मार्केटजवळ एका बंद घरामध्ये भरपावसात शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागली. या आगीत घरातील सर्व संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. सुदैवाने घरातील संपूर्ण कुटुंब गावी गेले असल्याने जीवितहानी टळली. काल रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

खारदेवनगर मार्केटजवळ असलेल्या हनुमान मंदिराच्या पाठीमागील गल्लीत स्मिता जाधव यांच्या मालकीच्या



घरात एक कुटुंब भाड्याने राहते. हे कुटुंब कोकणात गावी गेले होते. काल रात्री पाऊस सुरू असताना त्यांच्या घरातून अचानक धूर निघू लागला. धुराचे प्रमाण वाढत गेल्याने शेजाऱ्यांनी तत्काळ पोलीस आणि अग्निशमन दलाला कळवले. तोपर्यंत परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. दोन्ही यंत्रणेचे पथक घटनास्थळी पोहचून त्यांनी घराचा दरवाजा तोडून आतील आग आटोक्यात आणली.

## घरातील सामान खाक

मात्र या आगीत घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले होते. स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी घरातील सामान बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

# रेशन ऑफिसची पुनर्रचना कार्डधारकांना मनस्ताप

■ मुंबई

**सांताक्रूझ** (पूर्व)च्या शिधावाटप कार्यालयाची शासनाने पुनर्रचना नुकतीच केली आहे. यामुळे या परिसरातील हजारो रेशनकार्डधारकांना छोट्याछोट्या सरकारी कामासाठी कोसोमील दूरवर असलेल्या वांद्र्याच्या खेर नगरातील शिधावाटप कार्यालयात धाव घ्यावी लागणार आहे. या सरकारी गोंधळामुळे कार्डधारकांत संतापाचे वातावरण आहे.


विधानसभा मतदारसंघ निहाय पुनर्रचनेचे शासनाने कारण देत सांताक्रूझ येथील शिधावाटप कार्यालयाच्या सिमांकनाची तोडफोड केली. या कार्यालयाच्या हद्दीत येणाऱ्या पूर्वीपार पासून हनुमान टेकडी, गोळीबार, मराठा कॉलनी, डवरी नगर या वस्तीतील १५ रेशन दुकाने व त्यांच्याशी वर्षानुवर्षे संलग्न असलेले हजारो या वर्गीकरणामुळे सांताक्रूझमधील रेशनशी संबंधित असणाऱ्यांना कार्यालयीन कामकाजासाठी सर्वसामान्यांना खिशाला कात्री लावून वांद्र्याच्या शिधावाटप कार्यालयात जावे लागणार आहे. शासनाने या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी होत आहे.

# मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोडक सागर धरणाला गळती

■ मुंबई

**मुंबई** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांपैकी एक असलेल्या मोडक सागर धरणाला गळती लागली आहे. या धरणाच्या पूर नियंत्रण दरवाज्याचे रबर सील नादुरुस्त झाल्याने या धरणातून पाणी गळती होत पाणीपातळीत घट झाली आहे. या दोन्ही रबर सीलच्या दुरुस्तीसाठी मुंबई महापालिका ९८ लाख रुपये खर्च करणार आहे.

मुंबईला दररोज सुमारे ४ हजार दशलक्ष लीटर पाणीपुरवठा केला जातो. तानसा, मोडकसागर, मध्य वैतरणा,उर्ध्व वैतरणा आणि भातसा धरणांतून हा पाणीपुरवठा केला जात असून त्यापैकी मोडक सागर धरण हे अतिशय महत्त्वाचे धरण आहे. यातून मुंबईला प्रतिदिन १७०० दशलक्ष लीटर एवढा पाणी



पुरवठा होतो. उर्ध्व वैतरणा आणि मध्य वैतरणा धरणांतील पाणीसाठा हा मोडक सागर धरणात सोडला जातो आणि वैतरणा पात्रातील संपूर्ण पाणी हे मोडक सागर धरणाद्वारे मुंबई शहराला पुरविले जाते. मोडक सागर धरणावर आठ पूर नियंत्रण दरवाजे असून त्यांना विशेष प्रकारचे रबर सील दिलेले आहेत. धरण सुरक्षितता संघटना यांनी केलेल्या

## पूर नियंत्रण दरवाजांचे २ रबर सील नादुरुस्त

तपासणीत खराब झालेले रबर सील बदलण्याच्या सूचना केलेल्या आहेत. आता या रबर सीलची दुरुस्ती केली जाणार असून त्यासाठी तब्बल ९८ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.


# जळगाव स्थानकात अमृतसर एक्स्प्रेसच्या डब्याखालून धूर

■ जळगाव

**मुंबईहून** अमृतसरकडे जाणाऱ्या अमृतसर एक्स्प्रेसच्या एका डब्याखाली चाकाजवळून धूर निघू लागला. ही घटना आज सकाळी जळगाव रेल्वे स्थानकावर घडली. ही बाब लक्षात येताच रेल्वे कर्मचाऱ्यांनी आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना केल्या आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. खबरदारी म्हणून गाडी सुमारे २५ मिनिटे स्थानकावर थांबवण्यात आली होती.

प्राथमिक माहितीनुसार, रेल्वेच्या चाकांजवळील ब्रेक सिस्टीममध्ये अतिरिक्त घर्षण आणि अतिउष्णता निर्माण झाल्यामुळे धूर निघाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर गाडीला पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आले.

## नवाकाळ शब्दकोडे-१६५४



**आडवे शब्द –**

२. उपसागराहून लहान व निमुळता जलाशय ४. जास्वंदीचे फूल ६. अंगावर काटे असलेला प्राणी, साळू ९. नवेपणा ११. उपवर मुलीचे लग्न लावून देणे १२. आकाशमोगरा, बुचाची फुले १४. बछडा, छावा १७. अदमासे, सुमारे १८. इक्षुदंड १९. श्वासोच्छवास २०. रसदार, मधुर २२. मारुती २४. व्यवस्थित, मान्य २७. लाकडी पळी २८. प्रेम, मोह २९. ललाट, कपाळ ३०. वेढा, घेराव ३२. खुशाली, समाचार ३४. मत्स्य ३५. काव्य करणारा ३६. मुस्लिम साधू ३८. आग, ज्वाला ३९. अतिशय स्वार्थी, स्वकेंद्रित ४१. कमी महत्त्वाचे ४२. शुष्कता ४३. महान ४४. काटा, शूल ४५. पार्वतीचे एक नाव ४६. सांभाळ करणे, रक्षण करणे ४७. वर्तुळ, पुरुषांचे हस्तभूषण ४८. अर्जुनाचे धनुष्य ४९. लहान, छोटा ५१. दिवसाचा आठवा भाग, याम ५२. तेल लावून डोक्याला मालिश ५३. सरपटणारा भयानक प्राणी ५४. गाण्याची तान ५६. रास ५८. बोजा, वजन ५९. हिरव्या रंगाचे रत्न, पन्ना ६०. काशी ६२. अंगयष्टी, सोवळ्यातले रेशमी वस्त्र ६३. मांडी, बैठ्या खेळाचा मांडलेला डाव ६४. वार्धक्य ६६. रोगप्रतिबंधक इंजेक्शन ६८. फूटपाथ ७०. विल्हेवाट ७३. केशरी रंगाचा कंद ७४. गुलाम ७६. व्यर्थ, फुका ७८. श्रम ७९. श्रीकृष्ण ८०. साठा ८१. मूल्य, द्रव्य ८३. शांत ८४. बत्ती ८५. स्वकीय, आपली माणसे ८७. ओझे ८८. निर्मळ ८९. प्रथा, परंपरा ९०. विद्येची देवी ९१. मृतदेह ९२. लोकरीचे वस्त्र बनवण्याची प्रक्रिया ९४. वायू ९७. पंगा, वैर ९८. कीव यावी असे, केविलवाणे १००. शैत्य १०२. प्रथम १०३. ख्याती १०४. जाळे विणणारा कीटक १०५. सरशी १०६. स्वच्छंदी १०७. प्रसंग, वेळ १०८. धुडगूस, त्रास

**उभे शब्द –**

१. आई २. कव्हर, वेष्टन ३. भक्षण ४. परमेश्वर ५. पृष्ठ, पर्ण ६. घोड्यांची निगा राखणारा सेवक ७. चंद्र ८. विपुलता, वैपुल्य १०. सचकार, बयाणा रक्कम १२. संकट १३. दिराची बायको १५. सोनचाफा १६. ढग दाटून सूर्य झाकला जाणे, शिरवाळ १७. गाण्यातले कडवे २१. दर वर्षी, वर्षानुवर्षे २२. नाचणीची एक जात २३. पवित्र, मुलींचे एक नाव २५. त्रास, पीडा, अतिरेक २६. नेमस्त, सौम्य २९. शपथ ३१. वसकन अंगावर ओरडणे ३३. एक सहस्र ३४. महत्त्व, मोठेपण ३७. कीटकांचा प्रादुर्भाव ३९. भात व नाचणीची पेज ४०. ओतीव लोखंड ४२. दंड व हात यांना जोडणारा सांधा ४३. अल्प, मित ४४. अफवा, वदंता ४५. न उलगडणारे गुपित ४६. विष ४७. वानर ४८. भयभीत, गोधळलेला ४९. मोठा आवाज, बंदुकीची दारू ५०. बेसन, ताक वगैरेचा पातळ पदार्थ ५१. अंमल, पगडा ५२. पक्ष्यांची चोच ५३. विविध ५५. घायपात, घणसर ५७. खाई, संकट ५९. वृक्ष, झाड ६०. पैशांची थैली ६१. पाण्यात बुडी मारणे ६२. गुणांची कदर करणारा ६५. याग, हवन ६७. उत्तम वर्तन ६९. पक्ष्यांचा समूह ७१. सज्जन, भला ७२. धीर, बळ, उत्साह ७५. मैत्रीण, सखी ७७. याकरिता, म्हणून ७९. गणना, मोजणी ८०. अब्रूदार, प्रतिष्ठित ८२. देवांचा राजा, इंद्र ८४. मोकळ्या मनाचा, प्रांजळ ८५. गाण्यातील सूर ८६. इंद्रिय, गात्र ८८. ज्याला मृत्यू नाही असा ९०. सरकारचे, सरकारी ९१. भोवती कडी असलेला ग्रह ९३. चुगली, चहाडी ९५. पौर्णिमा ९६. यंत्रातील-वाहनातील धक्कारोधक ९९. योगायोग, ईश्वरेच्छा १०१. बाष्प •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६५३ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. भुजा ३. पागनीस ६. सुवासिक ९. गडगडाट १२. सदासर्वदा १४. डामडौल १६. जात्यंध १७. मती १९. खल २०.गुंग २१. डास २३. वाट २४. शीर २६. सवन २७. द्वाड २९. हार ३०. तडकाफडकी ३२. कच ३४. गिर्यारोहण ३६. पत ३७. टपाल ३८. सुरसुरी ४०. गीर ४१. जड ४२. पराग ४४. सारी ४६. भरमसाट ४८. राऊळ ४९. समेत ५०. धावदोरा ५२. दादर ५३. तसदी ५४. सारथी ५५. सगा ५६. लोड ५८. आब ५९. काल ६१. खाट ६२. मेज ६३. जाच ६५. हजरजवाबी ६७. महेश्वर ६८. तारू ६९. रबडी ७०. वमन ७१. दर ७२. फुकट ७४. भरती ७५. अकस्मात ७६. वटी ७७. वारुणी ७९. बेबनाव ८१. आवर ८२. नीहार ८४. पेव ८५. कासावीस ८८. जाणे ८९. सडक ९०. जळू ९२. गजरा ९४. मानिनी ९६. षटकार ९८. ईश १००. आपकमाई १०२. कमंडलू १०४. वितरक १०५. दार १०६. खैर १०७. कट

**उभे शब्द** : १. भुजा २. जादा ३. पार्वती ४. गदा ५. सडा ६. सुडौल ७. वाल ८. कजाग ९. गधडा १०. गर्क ११. टवटवीत १३. सम १५. मख १८. तवकील २०. गुंडगिरी २२. सहाण २५. रडतराऊत २६. सडपातळ २८. निरोगी ३१. फट ३२. कसुरी मेथी ३३. चर ३५. हरभरा ३६. पडसाद ३९. सुज्ञ ४१. जमदाड ४२. परा ४३. गळसरी ४४. सासर ४५. पाव ४७. टरबूज ५०. धागा ५१. दोला ५४. साबरमती ५५. सल ५६. लोट ५७. पैजार ५८. आजवर ५९. काबीज करणे ६०. आहेर ६१. खारफुटी ६२. मेरू ६४. चबढब ६६. जन ६७. मदतनीस ६८. ताटवा ७३. राणीवसा ७४. भवसागर ७५. अवजार ७६. वरकमाई ७८. रुपे ७९. बेट ८०. नाका ८२अ. हाड ८३. रजनीकर ८६. वीज ८७. सराईत ९१. खोट ९३. संपदा ९५. दंडक ९६. षष्ठी ९७. कान्हा ९९. शर १०१. कर १०३. लूट

# सचिन अहिर बिनविरोध मविआची अखेर माघार

पान १ वरून

अर्ज मागे घेण्याचे आवाहन केले. यानंतर ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी सभागृहात घोषणा करत, उपसभापती निवड सर्वानुमते व्हावी अशी सभागृहाची इच्छा आहे. त्यामुळे आम्ही उमेदवारी अर्ज मागे घेत आहोत, असे सांगितले. त्यानंतर सभागृहात आवाजी मतदान घेण्यात आले आणि सचिन अहिर यांची विधान परिषदेच्या उपसभापतीपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

सचिन अहिर यांच्या निवडीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, सचिन अहिर यांच्या निवडीबद्दल विरोधी पक्षाचेही आभार मानतो. १९९९ मध्ये मी आणि सचिन अहिर प्रथमच विधानसभेत निवडून गेलो होतो. अहिर या शब्दाचा अर्थ गोपालक आणि निर्भीड असा आहे. माझा त्यांच्याशी अनेक वर्षांचा परिचय असून ते अत्यंत निर्भीडपणे काम करणारे लोकप्रतिनिधी आहेत. उपसभापतिपदावर बसल्यानंतर प्रत्येक सदस्याला समान न्याय द्यावा लागतो. सचिन अहिर ही जबाबदारी अत्यंत सक्षमपणे पार पाडतील, असा मला विश्वास आहे. गिरणी कामगार संघटनेतील कार्यकर्ते म्हणून त्यांनी राजकारणाची सुरुवात केली. १९९९ मध्ये प्रथम आमदार झाले आणि त्यानंतर सलग तीन वेळा विधानसभेत निवडून आले. २००९मध्ये त्यांनी राज्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. अभ्यासू मंत्री म्हणून त्यांची ओळख होती. एखादा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला की काय अपेक्षा आहे? असे विचारून तो सोडवण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात आहे. अहिर जेव्हा विधान परिषदेत आले, तेव्हा ते धनुष्यबाण चिन्हावरच आले होते. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या त्यांनी पक्ष बदललेला नाही.

### महापुरुषांना अभिवादन

सभापतीपदी निवड झाल्यावर सचिन अहिर यांनी सर्वप्रथम गेटवे ऑफ इंडिया येथे जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्यालाही अभिवादन केले. सरतेशेवटी त्यांनी हुतात्मा चौक येथे जाऊन संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांना वंदन केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही सचिन अहिर यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले की, प्रत्येक व्यक्तीची काम करण्याची शैली वेगळी असते. टीममध्ये ऑलराऊंडर खेळाडू असले तरी योग्य वेळी योग्य निर्णय घ्यावे लागतात. अहिर याच्या नावातच सचिन आहे. एक सचिन (तेंडुलकर) देशाचे नाव उज्ज्वल करून निवृत्त झाला. आता दुसरा सचिन पॅड बांधून नव्या इनिंगसाठी मैदानात उतरला आहे आणि मैदान गाजवायला सज्ज आहे.

# स्कूल बस दुर्घटना! एकजण अतिदक्षता विभागात

पान १ वरून

गंभीर जखमींवर याच हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असून एकाला अतिदक्षता विभागात दाखल केले. या गंभीर घटनेबाबत चेंबूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली असून अद्याप कुणालाही जबाबदार धरून गुन्हा दाखल केलेला नाही. कारण या अपघातातील झाड कोसळण्यामागील नेमके कारण स्पष्ट झाल्यानंतर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. पुढील तपास चेंबूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद शहाणे हे करत आहेत. या दुर्घटनेतील मृत विद्यार्थी विहान हा गौरव श्रीवास्तव यांचा एकुलता एक मुलगा होता. गौरव हे चेंबूरच्या कुकरेजा रेसिडेन्सी इमारतीत राहतात. ते चार्टर्ड अकाऊंटंट आहेत. विहानची आईही कामाला जाते. चेंबूरमध्ये शाळेच्या वाहनावर झाड कोसळून विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा मुद्दा आज विधानसभेत आमदार तुकाराम काते यांनी उपस्थित केला. ते म्हणाले की, या दुर्घटनेप्रकरणी संबंधित मुंबई महापालिका अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा जबाबदार असून, त्या अधिकाऱ्यांवर तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी धोकादायक झाडांचे सर्वेक्षण करून वेळेत उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाची जबाबदारी निश्चित करावी. दरम्यान, या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी तीन अधिकाऱ्यांची समिती गठीत केली आहे. तसेच सहाय्यक उद्यान अधीक्षक आणि रस्ते अभियंता यांचे निलंबन करण्यात आले आहे.

**सूचना**

**तिफेरेथ इस्त्राएल प्रार्थनालयाच्या** व्यवस्थापक मंडळासाठी ९ सभासद व त्यातून ३ ट्रस्टींसाठी निवडणूक सभा रविवार दिनांक १२/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रार्थनालयाच्या मुख्य हॉलमध्ये भरविण्यात येणार आहे. तरी प्रार्थनालयाच्या सर्व सभासदांना या सभेस हजर राहाण्याची विनंती आहे.

**दिनांक: ०२/०७/२०२६**

सही/-
(श्री. एरन डॅनिएल बेंजामिन)
सन्मा. चिटणीस

# नोएल टाटा व्होल्टासच्या अध्यक्षपदावरून पायउतार

पान १ वरून - टाटा सन्सच्या १८ ऑगस्ट रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेकडेही भागधारक आणि गुंतवणुकदारांचे लक्ष लागले आहे. कारण या सभेत टाटा सन्सचे अध्यक्ष नटराजन चंद्रशेखरन यांच्या फेरनियुक्तीवर निर्णय होणार आहे. चंद्रशेखर यांचा कार्यकाळ वाढवायचा की नाही, यावर टाटा समूहाची मुख्य भागधारक कंपनी टाटा ट्रस्टमध्ये मतभेद आहेत. विशेषतः नोएल टाटा यांच्या नेतृत्वाखाली काही संचालकांनी चंद्रशेखरन यांच्या फेरनियुक्तीबाबत अधिक चर्चा व्हावी, अशी भूमिका घेतली आहे. टाटा ट्रस्टकडे टाटा सन्समधील सुमारे ६६ टक्के हिस्सा आहे. त्यामुळे टाटा सन्सची मालकी आणि व्यवस्थापन यांमध्ये समतोल कसा राखायचा हा कळीचा मुद्दा ठरला आहे.

# पेट्रोल ५, डिझेल ३ रुपयांनी स्वस्त

पान १ वरून

वाढ झाल्यानेही जागतिक पुरवठ्यात सुधारणा झाली असून त्याचा परिणाम दरांवर झाला आहे. नवीन दरानुसार दिल्लीत पेट्रोल १०२.१२ तर डिझेल ९५.२० रुपये झाले आहे. मुंबईत पेट्रोलचा दर १११.२१ आणि डिझेल ९७.८३, कोलकात्यात पेट्रोल ११३.५१ आणि डिझेल ९९.८२ रुपये इतका आहे. ही कपात देशभरातील कंपनीच्या ७,००० हून अधिक पेट्रोल पंपांवर लागू झाली आहे.

मात्र, इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या सरकारी तेल कंपन्यांनी आपल्या दरांमध्ये कोणताही बदल केलेला नाही. आजपासून व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरातही सरासरी १८० पर्यंत कपात करण्यात आली आहे. दिल्लीत १९ किलोचा सिलिंडर आता २,९३० रुपयांना मिळत असून, यापूर्वी त्याची किंमत ३,११३.५० होती. मुंबईत हा सिलिंडर २,८८५.५०, कोलकात्यात ३,०८१.५० आणि चेन्नईत ३,१०६ रुपये इतका झाला आहे. या दरकपातीमुळे हॉटेल, रेस्टॉरंट आणि केटरिंग व्यवसायाचा खर्च कमी होण्याची शक्यता असून, त्याचा फायदा ग्राहकांनाही मिळू शकतो. व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीमध्ये कपात झाली असली तरीही अजून १४ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.

**purple** FINANCE

**कार्यालय:** पर्पल फायनान्स लिमिटेड, ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५१.
**दूरध्वनी:** ०२२-६९१६५१२३, **वेबसाइट:** www.purplefinance.in

**ताबा सूचना** (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, **पर्पल फायनान्स लिमिटेड (पीएफएल)** चे अधिकृत अधिकारी म्हणून, अधोस्वाक्षरीकृत व्यक्तीने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट *(कायदा), २००२ (५४/२००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या कलम १३(१२) सहवाचिता नियम ९ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार आणि सह-कर्जदारांना सूचनेत नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याज ही सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करणारी **मागणी सूचना** जारी केली. कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, खाली स्वाक्षरीकर्त्याने सदर नियमांच्या नियम ९ सहवाचिता सदर *(कायदा) च्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना/तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक** ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही व्यवहारासाठी पर्पल फायनान्स लिमिटेडकडून संबंधित प्रत्येक मालमत्तेसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे शुल्क आकारले जाईल:

| अ. क्र. | कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्र./शाखा | ज्या प्रतिभूत मालमत्तेवर स्वारस्य निर्माण झाले आहे त्या मालमत्तेचे वर्णन | पाठवलेली मागणी सूचना दिनांक आणि थकबाकी रक्कम | वास्तविक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | १. विशाल चंद्रकांत देसले (कर्जदार) २. चंद्रकांत गणपत देसले (सह-कर्जदार) ३. पुष्पा चंद्रकांत देसले (सह-कर्जदार) **कर्ज खाते क्र.:** पीएफएलएसएलकेएएल ०००११०२ **शाखा :** कल्याण | घर क्र.४८४, मोजमाप १३२० चौ.फूट म्हणजेच १२२.६३ चौ. मीटर, जयगाव, खेवारे, पोस्ट मिल्हे, मुरबाड, हनुमान मंदिर जवळ, ठाणे, ग्रामपंचायत खेवारेच्या मर्यादित, तालुका मुरबाड आणि जिल्हा ठाणे - ४२१४०१ **चतुसिमा:** **पूर्व-** श्री.समाधान दामोदर रसाड यांचे घर, **पश्चिम-** मोकळे क्षेत्र, **दक्षिण-** मोकळे क्षेत्र, **उत्तर-** श्री.संजय मोतीराम देसले यांचे घर | १३.०४.२०२६ आणि रू. १५८८८५०/- | २९.०६. २०२६ |

**दिनांक: ०२.०७.२०२६, ठिकाण: ठाणे** **सही/- प्राधिकृत अधिकारी पर्पल फायनान्स लि.**

# बेकायदेशीर आयव्हीएफ केंद्रांवर मकोका

पान १ वरून - केली जाईल. याशिवाय, पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच आयव्हीएफ आणि सोनोग्राफी केंद्रांची नियमित तपासणी करण्यासाठी राज्यस्तरीय विशेष कृती दल (टास्क फोर्स) स्थापन करण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येईल. याशिवाय काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ग्रामीण रुग्णालयांतील रिक्त पदे, निधीअभावी रखडलेले आरोग्य प्रकल्प आणि आशा सेविका व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित देयकांचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर आबिटकर यांनी सांगितले की, राज्यात लवकरच १,४०० डॉक्टरांची भरती करण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच अपूर्ण आरोग्य प्रकल्पांना प्राधान्याने निधी उपलब्ध करून देण्याबरोबरच आशा सेविका आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांची थकीत देयकेही लवकरच अदा करण्यात येतील.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**TENDER NOTICE**

**Ref: EE/400KV/RS/O&M/DN/KLW/TECH/26-27/T-18/464** **Dt. 30.06.2026**

MSETCL invites online bids (SRM-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **http://srmetender.mahatransco.in** for following works,

| Sr. No. | RFX No. | Description of Work | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender |
|---|---|---|---|
| 1 | 7000040552 | SRM E-Tender (1st Call) for AMC for various maintenance activities to be carried out under planned and emergency outage through outsourced agency at 220KV Kalwa & 400KV Kalwa under 400KV R S O&M DN Kalwa for the F.Y.2026-27. | **Download and submission of tender Documents Date:** Dt.01.07.2026 11:00 Hrs to Dt.15.07.2026 up to 10:00 Hrs **Techno-commercial Opening: -** Dt.15.07.2026 at 11:00 Hrs (Onwards if possible) **Price Bid Opening:-** Dt.15.07.2026 at 12:00 Hrs (Onwards if possible) |
| | | **Tender Fee** | **Rs. 500/- + GST 5%** |
| | | **Estimated Cost (Including GST)** | **Rs. 40,19,249/-** |

**Contact Person:** Executive Engineer/ Dy. Executive Engineer (O) & Mob No. 9920082425/7977325020.

1. Relevant portions of the Tender which the tenderers have to fill online would be available on aforesaid website.
2. Tender documents can be downloaded by online from aforesaid website.
3. Eligible contractor agencies should submit their bid well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400KV RS O&M DN KALWA**

**purple** FINANCE

**कार्यालय:** पर्पल फायनान्स लिमिटेड, ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
**दूरध्वनी:** ०२२-६९१६५१२३, **वेबसाइट:** www.purplefinance.in

**मागणी सूचना**

ज्याअर्थी, पर्पल फायनान्स लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी, ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ येथे आहे आणि भारतातील विविध ठिकाणी शाखा आहेत (यापुढे 'पीएफएल' म्हणून संदर्भित) ही कंपनी, कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणीकृत आहे आणि पीएफएल ही सरफायसी कायद्याअंतर्गत प्रतिभूत धनको असल्याने आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या कलम १३(२) सहवाचिता नियम २ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदारांना / सह-कर्जदारांना सूचनेत नमूद केलेली रक्कम नोटिसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याजासह परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली आहे, त्याव्यतिरिक्त, खाली सूचीबद्ध केलेल्या कर्जदारांच्या माहितीच्या उद्देशाने, या जाहीर सूचनेद्वारे कर्जदारांना कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्र./शाखा | ज्या प्रतिभूत मालमत्तेवर स्वारस्य निर्माण झाले आहे त्या मालमत्तेचे वर्णन | एनपीए दिनांक | पाठवलेली मागणी सूचना दिनांक आणि थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | १. रोहिदास मोरेश्वर परहाद (कर्जदार) २. नयना रोहिदास पराड (सह-कर्जदार) ३. शकुंतला मोरेश्वर परहाद (सह-कर्जदार) **कर्ज खाते क्र.:** पीएफएलएसएलव्हीआयआर ००००४९६ **शाखा :** विरार | घर क्र.२५०, मोजमाप क्षेत्र ६६० चौ.फूट परनाळी पालघर, मु.गावठाण जमीन ग्रामपंचायत परनाळीच्या हद्दीत, तालुका आणि जिल्हा - पालघर - ४०१५०४. **चतुःसीमा:** **पूर्व** - श्री. किशोर नाना धांगडा, **पश्चिम** - श्री.रामू गणपत परहाद, **दक्षिण** - श्री.सुजित नरेंद्र धांगडा, **उत्तर** - श्री.चंद्रकांत नवशा परहाद | ०८.०६. २०२६ | १५.०६.२०२६ आणि रू. ३११३७०/- |

म्हणून, वर नमूद केल्याप्रमाणे, कर्जदार/सह-कर्जदारांना सूचना देण्यात येत आहे, ज्यामध्ये त्यांना ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ६० दिवसांच्या आत संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराविरुद्ध वर दर्शविल्याप्रमाणे एकूण थकबाकीची रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे. संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराने एकूण थकबाकीची रक्कम आणि पुढील व्याज भरण्यात अयशस्वी झाल्यास, पीएफएलला वर वर्णन केल्याप्रमाणे मालमत्तेवरील प्रतिभूत व्याज लागू करण्यासाठी कलम १३(४) अंतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल, कायद्यानुसार आणि येथे बनवलेल्या नियमांनुसार विहित केलेल्या इतर पद्धतीने नोटीस बजावण्यासाठी देखील पावले उचलली जात आहेत. आपणास हे नमूद करून कळविण्यात येते की, सरफायसी कायद्याच्या कलम १३(८) मध्ये तपशीलवार सांगितल्याप्रमाणे, जाहीर लिलावासाठी किंवा विक्रीच्या मार्गाने हस्तांतरणासाठी खाजगी कराराची सूचना प्रकाशित होण्याच्या तारखेपूर्वी कधीही पीएफएल द्वारे केलेल्या खर्चासह संपूर्ण देय रक्कम, शुल्क आणि खर्च भरल्यानंतर सदर गहाण ठेव परत मिळवता येते.

लक्षात ठेवा की सरफायसी कायद्याच्या एस-१३(१३) च्या अटींनुसार, तुम्हाला प्रतिभूत मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास आणि/किंवा व्यवहार करण्यास प्रतिबंधित केले आहे.

**दिनांक: ०२.०७.२०२६, ठिकाण: विरार** **सही/- प्राधिकृत अधिकारी पर्पल फायनान्स लि.**

**संक्षिप्त जाहिरात**
**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. विभाग, पनवेल (भिंगारी) ४१० २०६**
**ई-मेल :** panvel.ee@mahapwd.gov.in **दूरध्वनी क्रमांक :** ०२२ - २७४५२७७८
**ई-निविदा सूचना क्रमांक ०९ सन २०२६-२७**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (Authority) आणि मुख्य अभियंता (कोकण) तथा प्रकल्प संचालक (बासप्र) यांचे वतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल (भिंगारी) (दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८) हे ''बहुपक्षीय विकास बँकांच्या आर्थिक सहाय्याने ईपीसी मोडद्वारे हाती घ्यावयाच्या महाराष्ट्र राज्यामधील सोबतच्या टीओआरच्या (TOR) संलग्न परिशिष्ट IV मध्ये नमूद केलेल्या पॅकेजेसनुसार विविध रस्त्यांचे पक्क्या बाजूपट्यांसह (Paved Shoulders) दोन पदरी काँक्रीट रस्ते तयार करण्यासाठी व्यवहार्यता अभ्यासासह डीपीआर (DPR), सर्वेक्षण आणि भू-नकाशा तयार करणे, ज्यामध्ये सामाजिक, पर्यावरणीय आणि सीसीए (CCA) शमन अभ्यासाचा समावेश आहे, **पॅकेज क्र.** DPR Package 7 यासाठी सल्लागार सेवा नेमणे'' या कामांकरिता पात्र निविदाकारांकडुन दि.०२.०७.२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता ते दि.०९.०७.२०२६ पर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत ऑनलाइन पध्दतीने निविदा मागवित आहेत.

प्रस्तुत कामांची सविस्तर निविदा सूचना व निविदा प्रपत्र (ईपीसी नमुन्यात) शासनाच्या **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर पाहू/डाऊनलोड करु शकता. सविस्तर निविदा सूचना सा.बां. विभागाच्या **www.mahapwd.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक **०९.०७.२०२६** (दुपारी १५ वाजेपर्यंत) असेल.

सदर कामाची एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्विकृत/ रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखीव ठेवलेले आहेत. सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे**

| | |
|---|---|
| ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.०९.०७.२०२६ (दुपारी १५.०० वाजेपर्यंत) |
| स्पष्टीकरणासाठी तांत्रिक मुद्दे ऑनलाईनद्वारे उपस्थित करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.०६.०७.२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत |
| निविदापूर्व बैठकीचा दिनांक, वेळ व ठिकाण | मुख्य अभियंता (कोकण) व प्रकल्प संचालक (बासप्र) यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, बांधकाम भवन, ४ था मजला, बी-विंग, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१. दि.०६.०७.२०२६ दुपारी १२.०० वाजता (भारतीय वेळेनुसार) |
| निविदा प्रपत्र सेक्शन २, कलम ITB २१.१ नुसार हार्ड कॉपीमध्ये सादर करावयाचे दस्ताऐवजांचा अंतिम दिनांक, वेळ व ठिकाण | निविदा पत्रकात नमुद केल्याप्रमाणे संबंधित अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात. दि. १३.०७.२०२६ (दुपारी १५.०० वाजेपर्यंत) (भारतीय वेळेनुसार) |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण | दि.१३.०७.२०२६ (दुपारी १५.०० वाजता) (भारतीय वेळेनुसार) (अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, नवीमुंबई यांचे कार्यालय) |

जा.क्र. काअ/पनवेल/निविदा/.....
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा. बां. विभाग, पनवेल
दिनांक :

सही/-
**कार्यकारी अभियंता**
सा.बां.विभाग,
पनवेल

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/ क्र.-५/ सी १४१३

नवाकाळ

• मुंबई । गुरुवार २ जुलै, २०२६ • पान -८

# सप्तपदीशिवाय लग्न वैध ठरत नाही

## गुजरात हायकोर्टाचा निर्वाळा

**अहमदाबाद** - हिंदू विवाह कायद्याशी संबंधित एक महत्त्वपूर्ण निकाल गुजरात उच्च न्यायालयाने दिला आहे. हिंदू दाम्पत्यांसाठी सप्तपदीसारख्या पारंपरिक विवाहविधी पार पाडल्या नसतील तर केवळ कायदेशीर नोंदणी झाली म्हणून असा विवाह वैध धरता येणार नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. ब्रिटनमध्ये व्यास्तव्यास असलेल्या एका भारतीय व्यक्तीचे लग्न कुटुंब न्यायालयाने अवैध ठरवले होते. त्या निर्णयाला संबंधित व्यक्तीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यावरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने वरील महत्त्वपूर्ण निर्वाळा देत कुटुंब न्यायालयाचा निकाल वैध ठरवला.



# नीट परीक्षेसाठी नवी नियमावली 'पहिले या, पहिले मिळवा' तत्त्व रद्द

■ नागपूर

**राष्ट्रीय** परीक्षा बोर्डाने (एनबीई) नीट परीक्षेसाठी महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना आणि नियमावली जारी केली आहे. यामध्ये चाचणी केंद्रांच्या वाटपासाठी 'पहिले या, पहिले मिळवा' हे तत्त्व रद्द करण्यात आले असून, राज्यांच्या निवडीसाठी नवीन नियम लागू करण्यात आले आहेत. उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध होणारे 'माहिती बुलेटिन' काळजीपूर्वक वाचावे, असे बोर्डाने स्पष्ट केले आहे.

नीट-पीजी परीक्षेत चाचणी शहरांचे वाटप 'पहिले या, पहिले मिळवा' या तत्त्वावर




केले जाणार नाही. उमेदवाराने लवकर अर्ज सादर केल्यामुळे त्याला कोणत्याही विशिष्ट परीक्षा राज्य, शहर किंवा केंद्राच्या वाटपासाठी प्राधान्य मिळणार नाही. त्यामुळे अर्जदारांनी घाई न करता संपूर्ण काळजी घेऊनच आपला फॉर्म अंतिम करावा, कारण अंतिम सबमिशननंतर माहितीमध्ये कोणताही बदल किंवा सुधारणा केली जाणार नाही. चाचणी केंद्रांसाठी राज्यांची निवड करताना उमेदवारांना अर्जामध्ये आपल्या आवडीच्या तीन राज्यांची निवड करावी लागेल. यामध्ये पहिले प्राधान्य दिलेले परीक्षा राज्य हे उमेदवाराच्या अर्जातील पत्रव्यवहार पत्त्याचे (करस्पाँडंट स्टेट) राज्य असणे अनिवार्य आहे.

# कोकणात मुसळधार पाऊस! राज्यभर अलर्ट शेतीला दिलासा तर जनजीवन विस्कळीत

■ मुंबई

**जून** महिनाभर दडी मारलेल्या पावसाने राज्यातील खरीप हंगामाला मोठा फटका दिला होता. मात्र जुलैच्या पहिल्याच आठवड्यात पावसाने दमदार हजेरी लावली. भारतीय हवामान विभागाने पुढील २४ ते ४८ तास कोकण, घाटमाथा, मुंबई महानगर प्रदेश आणि राज्यातील अनेक जिल्ह्यांसाठी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देत ऑरेंज आणि



यलो अलर्ट जारी केला आहे. पालघरमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाने शाळांना सुट्टी जाहीर केली आहे.

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात यावर्षी जून महिना गेल्या पाच वर्षांतील सर्वात कोरडा ठरला. सरासरी ८८० मिमी पावसाच्या तुलनेत केवळ ५०७.३ मिमी पावसाची नोंद झाली. मात्र गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधार आणि मुसळधार पावसामुळे एकीकडे रखडलेल्या भातशेतीला नवसंजीवनी मिळाली तर दुसरीकडे जनजीवनावर त्याचा परिणाम झाला. कणकवलीतील नगरपरिषदेच्या ५० वर्षे जुन्या भाजी मार्केट इमारतीचा काही भाग कोसळला, तर देवगड तालुक्यात संरक्षण भिंत कोसळून महिला जखमी झाली. रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यात मुंबई-गोवा महामार्गावरील वेरळ घाटात चौपदरीकरणासाठी 》पान ५ वर

### आज अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस

हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, अकोला, अमरावती, बुलडाणा आणि चंद्रपूर येथे ऑरेंज अलर्ट तर पालघर, सिंधुदुर्ग, पुणे घाटमाथा, अहिल्यानगर, सांगली, सोलापूर, बीड, हिंगोली, धाराशिव, नांदेड, लातूर, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ, भंडारा आणि गोंदिया येथे यलो अलर्ट आहे. कोकण किनारपट्टीवर काही ठिकाणी अतिमुसळधार पाऊस, मेघगर्जना आणि ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. घाट परिसरात काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

# अमरनाथ शिवलिंगाची उंची घटली

■ जम्मू

**अमरनाथ** गुहेतील बर्फापासून तयार होणाऱ्या पवित्र शिवलिंगाची उंची यंदा लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. दोन महिन्यांपूर्वी २० ते २२ फूट असलेली

### उंची ८ फुटांवर

उंची सध्या ७ ते ८ फुटांवर आली आहे. मूळ शिवलिंगाचा जाड भाग साधारण ६ ते ८ फूट असतो. त्यावर गोठलेल्या बर्फामुळे उंची अधिक दिसते. मात्र, अलीकडच्या काळात ही उंची वेगाने घटत आहे. तज्ज्ञांच्या मते, वाढते जागतिक तापमान, हवामानातील बदल आणि यात्रेदरम्यान मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांमुळे गुहेतील तापमान वाढते, त्यामुळे हिमलिंग वितळण्याचा वेग वाढतो. यापूर्वीही २०१३, २०१६ आणि २०१८ मध्ये यात्रा संपण्यापूर्वीच शिवलिंग नाहीसे झाले होते. दरम्यान, यंदाची अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू होणार असून, २ जुलै रोजी पहिला जत्था जम्मूमधून रवाना होणार आहे. भाविकांची जम्मूमध्ये ये-जा सुरू झाली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण यात्रा मार्गावर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसेच काही ठिकाणी तात्पुरते निर्बंध लागू करण्यात आले आहेत. नोंदणी कमी झाल्यामुळे प्रशासनाने ऑन-द-स्पॉट नोंदणीची सुविधाही सुरू केली असून, त्याला भाविकांचा प्रतिसाद मिळत आहे.

# व्हेनेझुएलात मृत्यू झालेल्या भारतीय खलाशाचे हृदय, मेंदू, फुफ्फुसे गायब

■ नवी दिल्ली

**दक्षिण** अमेरिकेतील व्हेनेझुएला येथे मृत्यू झालेला ३३ वर्षीय भारतीय खलाशी राकेश चौहान यांच्या मृत्यूला धक्कादायक वळण मिळाले आहे. मृतदेह भारतात आल्यानंतर केलेल्या शवविच्छेदनात त्यांच्या शरीरातील हृदय, मेंदू, दोन्ही फुफ्फुसे, यकृत, मूत्रपिंडे आणि इतर महत्त्वाचे अवयव गायब असल्याचे उघड झाले. या धक्कादायक प्रकारामुळे कुटुंबियांनी संशय व्यक्त करत चौकशीची मागणी केली आहे. खलाशांच्या संघटनेनेही व्हेनेझुएला सरकार आणि भारतीय दूतावासाने हस्तक्षेप करून या प्रकरणाचा छडा लावण्याची मागणी केली आहे.



उत्तर प्रदेशातील देवरियाचे रहिवासी राकेश चौहान हे मर्चंट नेव्हीच्या कामासाठी नोव्हेंबर २०२५ मध्ये व्हेनेझुएलाला गेले होते. मे महिन्यात कंपनीने त्यांच्या मृत्यूची माहिती दिली, मात्र मृत्यूचे कारण आणि शवविच्छेदन अहवालाबाबत वेगवेगळी माहिती दिल्याचा आरोप कुटुंबियांनी केला. कंपनीने आठवडाभरात मृतदेह भारतात आणण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, जवळपास महिनाभरानंतर ४ जून रोजी राकेशचा मृतदेह देवरिया येथे पोहोचला. संशय वाढल्याने कुटुंबियांनी पुन्हा शवविच्छेदन करण्याची मागणी केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर झालेल्या पोस्टमार्टममध्ये राकेश यांच्या शरीरातून हृदय, मेंदू, दोन्ही फुफ्फुसे, यकृत, दोन्ही मूत्रपिंडे, प्लीहा, स्वादुपिंड, जठर, आतडे, थायरॉईड व श्वसननलिका यांसह अनेक अंतर्गत अवयव गायब असल्याचे आढळले.

# लष्करप्रमुख धीरज सेठ यांनी पदभार स्वीकारला

■ नवी दिल्ली

**जनरल** धीरज सेठ यांनी आज भारतीय सैन्याचे ३१वे लष्करप्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी तंत्रज्ञानाधारित आणि भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज असलेला भारतीय सैन्य उभारण्याचा संकल्प व्यक्त करत त्यांनी आपले धोरणात्मक व्हिजन सादर केले.

पदभार स्वीकारल्यानंतर जनरल सेठ म्हणाले की, भारतीय सैन्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी अभिमानाचा आणि नम्रतेचा क्षण आहे. 'कर्तव्य, सन्मान आणि राष्ट्र प्रथम' या मूल्यांप्रती आपण कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. तसेच पंतप्रधान आणि संरक्षण मंत्र्यांनी त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी आभार मानले. जनरल सेठ यांनी देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करत, त्यांचे शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि निःस्वार्थ सेवा भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील. पंतप्रधानांनी सशस्त्र दलांसाठी मांडलेले विजय हे मार्गदर्शक तत्त्व भारताच्या यशाचा पाया आहे आणि तेच विजयाकडे घेऊन जाणारे आहे.

# डॉ. वळसंगकरांच्या कुटुंबातील संपत्तीचा वाद विकोपाला! जावयावर विनयभंगाचा गुन्हा

■ सोलापूर

**सोलापूरचे** दिवंगत ज्येष्ठ मेंदूरोगतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबातील संपत्तीचा वाद विकोपाला गेला आहे. याशिवाय डॉ. वळसंगकर यांचे जावई सुजय फडकेविरोधात बाजार पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे या प्रकरणाला नवे आणि गंभीर वळण मिळाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. वळसंगकर यांच्या नात्यातील एका महिलेने दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई झाली. जानेवारी २०२६ ते जून २०२६ या कालावधीत संपत्तीच्या वादातून सुजय फडके यांनी संबंधित महिलेला वारंवार त्रास दिल्याचा आरोप तक्रारीत आहे. महिलेला घरात येण्याजाण्यास मज्जाव करणे, तिच्या परवानगीशिवाय घरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, तसेच वीज आणि पाणीपुरवठा बंद करून मानसिक छळ करणे, अशाप्रकारे विनयभंग केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. डॉ. शिरीष वळसंगकर यांनी १८ एप्रिल २०२५ रोजी आत्महत्या केली होती. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या मालमत्तेच्या वाटपावरून कुटुंबातील सदस्यांमध्ये वाद सुरू झाला. गेल्या काही महिन्यांपासून हा वाद तीव्र झाला. डॉ. वळसंगकर हे सोलापूरमधील प्रसिद्ध न्युरोफिजिशियन होते. त्यांच्या नेतृत्वाखाली अत्याधुनिक सुविधा असलेले एस. पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्सेस रुग्णालय उभे राहिले. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणाच्या सीमाभागातील हजारो रुग्णांवर त्यांनी यशस्वी उपचार केले.

# तारापूर एमआयडीसीतील कारखान्यात स्फोट! २ जखमी

■ पालघर

**पालघर** जिल्ह्यातील बोईसर येथील तारापूर एमआयडीसीतील 'केमेट इंडस्ट्रीज' या रासायनिक कारखान्यातील रिक्टरचा स्फोट झाला. या दुर्घटनेत दोन कामगार गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने बोईसरमधील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. इतर कामगार वेळीच कारखान्याबाहेर पडल्याने त्यांचा जीव वाचला.

स्फोटाचा आवाज आणि त्याचे धक्के दीड ते दोन किलोमीटरपर्यंत जाणवल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. जखमी कामगारांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. तारापूर एमआयडीसी परिसरात रासायनिक कारखान्यांमधील स्फोट आणि दुर्घटनांच्या घटना वारंवार घडत असल्याने चिंता व्यक्त होत आहे. स्थानिक कामगार संघटना आणि नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक कारखान्यांमध्ये सुरक्षा नियमांचे उल्लंघन केले जात असल्याचा आरोप आहे.

# जे पवारांचे झाले नाहीत ते आमचे काय होणार

### सचिन अहिरांवर राऊत यांची प्रतिक्रिया

■ मुंबई

**शिवसेना** उबाठाला शेवटच्या क्षणापर्यंत गाफील ठेवून शिंदेसेनेतून विधान परिषद उपसभापतिपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या सचिन अहिर यांच्यावर आज उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी कडाडून टीका केली. जे शरद पवारांचे होऊ शकले नाहीत, ते आमचे काय होणार, अशी उद्विग्नताही राऊत यांनी व्यक्त केली.

सचिन अहिर यांना उबाठाने सर्वकाही दिले. विधान परिषदेची उमेदवारी देऊन त्यांची राजकीय कारकीर्द सावरली. कामगार संघटना दिली. एवढेच नव्हे तर अख्खा पुणे जिल्हा त्यांच्या हाती सोपवला. तरीही अहिर आम्ही झोपेत असताना आमच्या डोक्यात दगड टाकून निघून गेले, अशा शब्दात राऊत यांनी संताप व्यक्त केला.



उबाठात सध्या सुरू असलेल्या फोडाफोडीबद्दल राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका केली. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या दहा-बारा वर्षांपासून जे हिडीस प्रकार सुरू आहेत ते अत्यंत क्लेषदायक आहेत. महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि वैचारिक नासाडी केली जात आहे. या संपूर्ण काळ्याकुट्ट कालखंडाचा जेव्हा इतिहास लिहिला जाईल तेव्हा त्यात बहुतांश पाने ही देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यावरच खर्ची पडतील. तेवढी नासाडी या दोघांनी करून ठेवली आहे, असे राऊत म्हणाले.


# मराठवाड्यात ३ लाख कुणबी जात प्रमाणपत्रांचे वितरण

■ छत्रपती संभाजीनगर

**मराठा-कुणबी** आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यात कुणबी जात प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया सुरू असून, आतापर्यंत ३ लाख ४ हजार ६४१ अर्जांपैकी ३ लाख ४ हजार ५१ अर्जदारांना प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. ४३० अर्ज नामंजूर करण्यात आले असून १६० अर्ज प्रलंबित आहेत, अशी माहिती विभागीय आयुक्तालयाने दिली.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २४ हजार ४९५ अर्जांपैकी २४ हजार ४३१ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली असून एकही अर्ज प्रलंबित नाही. जालना येथे ५३, परभणी येथे ३८ आणि धाराशिव येथे ४२ अर्ज प्रलंबित आहेत. धाराशिवमध्ये २४५ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. १ सप्टेंबर २०२५ ते २९ जून २०२६ या कालावधीत मराठवाड्यात एकूण ६५ हजार ३० कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. यामध्ये बीड जिल्ह्याचा ४०,८६५ प्रमाणपत्रांसह सर्वाधिक वाटा असून त्यानंतर परभणी (५,५७८), धाराशिव (५,०१९), छत्रपती संभाजीनगर (४,७७७) आणि हिंगोली (४,१८९) जिल्ह्यांचा समावेश आहे. एकूण अर्जांमध्ये बीड जिल्ह्यात सर्वाधिक २ लाख ४ हजार २५ अर्ज प्राप्त झाले होते.

# पश्चिम रेल्वे ट्रॅकवर माकडाचे ठाण मध्य व हार्बर रेल्वे मार्गही विस्कळीत



■ मुंबई

**मुंबईत** आज सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उपनगरीय रेल्वे सेवा संथ गतीने सुरू असतानाच, बोरिवली रेल्वे स्थानकावरील ट्रॅकवर एक माकड तब्बल १५ ते २० मिनिटे ठाण मांडून बसल्याने पश्चिम रेल्वेची लोकल वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. सुरक्षेच्या कारणास्तव काही लोकल गाड्या थांबवाव्या लागल्या, तर दोन ते तीन लोकल गाड्या रद्द केल्या. त्यामुळे सकाळच्या गर्दीच्या वेळी हजारो प्रवाशांचा खोळंबा झाला. याशिवाय तांत्रिक बिघाडामुळे मध्य व

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

हार्बर रेल्वे मार्गही विस्कळीत झाले होते.

बोरिवली स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ जवळील रेल्वे रुळांवर अचानक माकड येऊन बसले. रेल्वे रुळांवर प्राणी असल्याने कोणताही अपघात होऊ नये, यासाठी रेल्वे प्रशासनाने तत्काळ खबरदारी घेत त्या मार्गावरील लोकल गाड्यांचा वेग कमी केला आणि काही गाड्या थांबविल्या. यामुळे पश्चिम रेल्वेचे वेळापत्रक विस्कळीत झाले. रेल्वे सुरक्षा बल आणि रेल्वे कर्मचाऱ्यांना जवळपास १५ मिनिटांच्या प्रयत्नांनंतर माकडाला ट्रॅकवरून हटविण्यात यश आले. त्यानंतर टप्प्याटप्प्याने लोकल सेवा पूर्ववत करण्यात आली.

# बदल्यांवरून 'ईएसआयसी'त नाराजी २२ जुलैपासून बेमुदत देशव्यापी संप

■ नवी दिल्ली

**कर्मचारी** राज्य विमा महामंडळ (ईएसआयसी) मधील नर्सिंग अधिकाऱ्यांच्या सक्तीच्या बदल्यांवरून वाद चिघळला आहे. ऑल इंडिया ईएसआयसी नर्सिंग ऑफिसर्स फेडरेशनचे जोधराज बैरवा यांनी जारी केलेल्या निवेदनानुसार २२ जुलै २०२६ पासून देशव्यापी बेमुदत संपाचा इशारा दिला. बदल्यांचे आदेश तातडीने मागे घ्यावे अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला. त्यांनी केंद्रीय कामगार व रोजगार मंत्री तसेच ईएसआयसी प्रशासनाला संपाची अधिकृत नोटीस दिली आहे.

आंदोलकांच्या म्हणण्यानुसार वार्षिक सर्वसाधारण बदली प्रक्रियेत कोणतेही स्पष्ट निकष न पाळता मोठ्या प्रमाणावर नर्सिंग अधिकाऱ्यांच्या सक्तीच्या बदल्या केल्या आहेत. या बदल्या विद्यमान धोरणाच्या विरोधात असून त्यामध्ये पारदर्शकतेचा अभाव आहे. अनेक नर्सिंग अधिकारी आणि सहाय्यक नर्सिंग अधीक्षकांची त्यांचा सेवाकाल, ज्येष्ठता आणि नियमांकडे दुर्लक्ष करून शेकडो ते हजारो किमी दूर बदली केली आहे. संस्थात्मक ज्येष्ठता स्वीकारलेल्या कर्मचाऱ्यांनाही सक्तीच्या बदल्यांना सामोरे जावे लागले आहे.

**महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. टोल वसुलीबाबतच्या नियमांमध्ये बदल करण्यात आला असून, नव्याने उभारल्या जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग आणि एक्स्प्रेसवेवरील दोन टोल नाक्यांमध्ये आता किमान ६० किलोमीटरचे अंतर ठेवणे आवश्यक असणार आहे. या निर्णयामुळे वाहनचालकांचा प्रवास खर्च कमी होण्यास मदत होणार आहे.**

# ६० किलो मीटर अंतरापर्यंत आता एकच टोलनाका असणार

■ पुणे

**यापूर्वी** अनेक ठिकाणी अवघ्या ३० ते ४० किलोमीटर अंतरावरच दुसरे टोल नाके उभारले जात होते. त्यामुळे कमी अंतराच्या



प्रवासातही वाहनचालकांना वारंवार टोल भरावा लागत होता. याबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी होत असल्याने रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने नवीन नियम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या बदलामुळे विशेषतः दररोज महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. कमी अंतरात पुन्हा टोल भरावा लागणार नसल्याने प्रवासाचा खर्च कमी होण्याची

### केंद्र सरकारचा निर्णय

शक्यता आहे. फास्टॅग वापरणाऱ्या वाहनचालकांनाही या निर्णयाचा फायदा होणार आहे. टोल नाक्यांची संख्या कमी झाल्यामुळे टोल प्लाझांवरील वाहतूक कोंडी कमी होईल. तसेच टोल भरण्यासाठी लागणारा वेळही वाचणार असल्याने प्रवास अधिक वेगवान आणि सोयीस्कर होईल.

# विलास घुलेच्या कुटुंबियांचे पाण्याच्या टाकीवर आंदोलन

■ बीड

**केज** तालुक्यातील टाकळी गावातील बहुचर्चित विलास घुले हत्या प्रकरणातील संशयित आणि खासदार बजरंग सोनवणे यांचा मुलगा सौरभ सोनवणे यांच्या अटकेच्या मागणीसाठी घुले कुटुंबियांनी पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले' स्टाईल आंदोलन केले. प्रशासनाने घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. अखेर पोलिसांनी समजूत घातल्यावर घुले कुटुंबियांनी आंदोलन मागे घेतले. २० जून रोजी टाकळी येथे विलास घुले यांची चाकूने वार करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात आतापर्यंत पोलिसांनी १० आरोपींना अटक केली असून तपास सुरू आहे. या प्रकरणात बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांचे सुपुत्र सौरभ सोनवणे यांचे नाव आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# जंतरमंतर आंदोलनाचा १२ वा दिवस वांगचुक चौथ्या दिवशी उपोषणावर ठाम

■ नवी दिल्ली

**नीट परीक्षा** व्यवस्थेतील गैरप्रकार, वारंवार होणारी प्रश्नपत्रिका फुटी आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा या मागण्यांसाठी जंतरमंतरवर अभिजित दीपके यांच्या नेतृत्वात कॉकरोच जनता पार्टीच्या सुरू असलेल्या आंदोलनाचा आज १२ वा दिवस होता. याठिकाणी सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक हेही उपोषण करत असून ते चौथ्या दिवशीही आपल्या उपोषणावर ठाम होते. त्यांच्यासह उपोषणाला बसलेल्या ६ विद्यार्थी आंदोलकांची प्रकृती खालावत आहे. दरम्यान, सरकारने मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी पुन्हा केली.

आपल्या प्रकृतीबाबत वांगचुक यांनी व्हिडिओद्वारे माहिती देताना सांगितले की, तीन दिवस अन्न न घेतल्याने थोडा थकवा जाणवत आहे. रक्तदाब कमी असल्यामुळे डॉक्टरांनी पाणी आणि मीठाचे प्रमाण वाढवण्याचा सल्ला दिला आहे. माझ्या रक्तातील साखरेची पातळी ६६ पर्यंत खाली आली असली, तरी उपोषणाच्या या टप्प्यावर ते अपेक्षित आहे. शरीर आता चरबीचा वापर ऊर्जा म्हणून करत आहे. हे दीर्घकाळ चालल्यास स्नायू आणि अवयवांवर परिणाम होऊ शकतो. मात्र, माझी स्थिती अद्याप गंभीर नाही. उपोषण सुरू झाल्यापासून सुमारे दोन किलो वजन कमी झाले आहे. मात्र, विद्यार्थ्यांनी न्यायासाठी दिलेल्या लढ्याच्या तुलनेत हा त्रास अत्यंत किरकोळ आहे.